१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, मंगळवार १२ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२६, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 326, Marathi - Daily - Pune, 12 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com


## माधुरी हत्तीणीबाबत सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी सुनावणी



**मुंबई -** कोल्हापुरातल्या नांदणीतून माधुरी हत्तीण गुजरातच्या वनतारा येथे नेल्यानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. नांदणी मठाकडून दाखल केलेली याआधीची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली होती. यानंतर आता वनतारा, महाराष्ट्र सरकार आणि नांदणी मठाने एकत्रित पुनर्विलोकन याचिका दाखल केली. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील पीठासमोर गुरुवार १४ ऑगस्टला सुनावणी होणार आहे.

# मतचोरी केली! मोदी सरकार घाबरट? विरोधक आक्रमक

# ३०० खासदारांचे रस्त्यावर एकत्र आंदोलन ! शक्तिप्रदर्शन

■ नवी दिल्ली

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीने आज मतदार यादीतील गैरप्रकार आणि मतचोरीच्या आरोपावरून संसद भवन ते केंद्रीय निवडणूक आयोग कार्यालय असा मोर्चा काढला. या मोर्चात अभूतपूर्व एकी दाखवत विरोधी पक्षांचे ३०० खासदार सहभागी झाले. या मोर्चाला निवडणूक आयोग इमारतीपर्यंत जाऊ दिले नाही, मोर्चात खासदार असूनही त्यांना अडविले, ताब्यात घेतले आणि पोलीस स्टेशनला नेऊन मग सोडले. यावर प्रतिक्रिया देताना प्रियंका गांधी म्हणाल्या की, हे सरकार घाबरट आहे.**

**दिल्ली** पोलिसांनी बॅरिकेड लावून लगेचच मोर्चा अडवत राहुल गांधी यांच्यासह विरोधी खासदारांना अटक केली. त्यांना दोन तासांनी सोडून देण्यात आले. परंतु या मोर्चामुळे दिल्लीतील वातावरण ढवळून निघाले. या मुद्यावरून सरकारला आपली ताकद दाखवण्याचा 'इंडिया' आघाडीचा प्रयत्न यशस्वी ठरला.

राहुल गांधी यांनी गेल्या आठवड्यात पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. मागील लोकसभा आणि काही राज्यांतील विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी कशा प्रकारे झाली हे त्यांनी पुराव्यासह दाखवून दिले. या आरोपांनंतर निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांनी शपथपत्रावर आरोप करा, असे निर्देश दिले. मात्र, राहुल गांधी यांनी हा मुद्दा लावून धरला. इतर विरोधी पक्षांकडूनही त्याला पाठबळ मिळाल्याने आज मतचोरी विरोधातील मोर्चाची घोषणा करण्यात आली होती. संसद ते निवडणूक आयोगाचे कार्यालय असा मोर्चा निघणार होता. पण सकाळी विरोधी पक्षांचे खासदार संसदेबाहेर जमण्यापूर्वीच निवडणूक आयोगाने काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांना पत्र पाठवून दुपारी १२ वाजता ३० जणांच्या शिष्टमंडळाला भेटायला बोलावले. जागेअभावी ही अट घालण्यात आल्याचे आयोगाने पत्रात नमूद केले होते. मात्र, विरोधकांनी सर्व खासदार एकत्र जातील, अन्यथा कोणीही जाणार नाही, अशी भूमिका घेतली. आम्ही केवळ बैठकीसाठी नाही, तर निवेदन सादर करण्यासाठी येणार आहोत, तिथे जागा कमी असेल तर हॉलमध्ये ही बैठक घ्या, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निवडणूक आयोगाने त्याला प्रतिसाद न दिल्याने सकाळी ११ वाजता मोर्चाला संसद भवनाच्या मकरद्वारातून सुरुवात झाली. 'सेव्ह व्होटचे बॅनर आणि वोट चोर, गद्दी छोड' अशा घोषणांसह खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या दिशेने कूच करू लागले. या मोर्चात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आदी २५ पक्षांचे खासदार सहभागी झाले होते. राहुल गांधी, प्रियंका गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, संजय राऊत, अखिलेश यादव, डिंपल यादव, शशी थरूर, जयराम रमेश, महुआ मोईत्रा, सयानी घोष आदि नेते मोर्चात होते. मोर्चा वाहतूक भवनाजवळ पोहोचताच दिल्ली



पोलिसांनी बॅरिकेड लावून तो अडवला. यावेळी विरोधक आक्रमक झाले. तृणमूलच्या महुआ मोईत्रा आणि सयानी घोष यांनी बॅरिकेडवर चढून घोषणाबाजी केली. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी बॅरिकेडवरून उडी मारत पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला. काही खासदार तिथेच जमिनीवर ठिय्या देऊन बसले. काँग्रेसचे रणदीप सुरजेवाला यांनी 'बोल रहा है पूरा देश, वोट हमारा छूके देख' अशी घोषणाबाजी केली. यादरम्यान महुआ मोईत्रा, तृणमूलच्याच मिताली बाग आणि काँग्रेसच्या संजना जाधव या तिघीजणी बेशुद्ध पडल्या. त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या दरम्यान, मोर्चाला परवानगी नसल्याचे सांगून पोलिसांनी राहुल गांधी, प्रियंका गांधी, सुप्रिया सुळे, अखिलेश यादव, संजय राऊत यांसह » पान ८ वर

## भ्रष्ट मंत्र्यांचा राजीनामा का नाही? उबाठाचे राज्यव्यापी आंदोलन




**राज्यातील सरकारमधील मंत्र्यांची बेजबाबदार विधाने, वागणूक व भ्रष्टाचार हे उघड झाल्याने त्यांची मंत्रिमंडळातून ताबडतोब हकालपट्टी करा, या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे आज राज्यभर जनआक्रोश आंदोलन केले गेले. मुंबईत या आंदोलनात उद्धव ठाकरे यांच्यासहीत आदित्य ठाकरे सहभागी झाले होते. यावेळी कार्यकर्त्यांनी पत्त्याचा मुगूट घातला, डान्सबारचे नाटकीय सादरीकरण केले, बनियन व टॉवेल नेसून मारहाणीचे नाट्य सादर केले, बनावट नोटांनी भरलेल्या अनेक बॅगा दाखवत अनोख्या पद्धतीने हे आंदोलन केले. त्यानंतर पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत विरोधी पक्षाच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर करत नेत्यांना अटक केल्याचा धिक्कार केला.**

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाई का करत नाहीत? त्यांच्यावर कोणाचा दबाव आहे का, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी दादर येथील आंदोलनावेळी उपस्थित केला. महायुतीच्या सरकारमध्ये सामील असलेले माणिक कोकाटे, संजय शिरसाट, योगेश कदम, संजय गायकवाड, भरत गोगावले, मेघना बोर्डीकर यांची अनेक विधाने » पान ७ वर

## दादरच्या कबुतरखान्यावर पालिकेकडून पुन्हा ताडपत्री

**पोलिसांचा बंदोबस्त सुरुच**

■ मुंबई



**दादर** पश्चिम येथील कबुतरखान्यावर मुंबई महापालिकेकडून पुन्हा ताडपत्री टाकण्यात आली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेने या कबुतरखान्यावर लावलेली ताडपत्री ६ ऑगस्ट रोजी जैन समाजाच्या आंदोलनावेळी हटवली होती. मात्र, उच्च न्यायालयाने यासंदर्भातील आपला आदेश कायम ठेवला असल्याने महापालिकेने काल रात्री उशिरा पोलिसांच्या मदतीने कबुतरखान्यावर ताडपत्रीचे आवरण घातले. या परिसरात अडथळे लावून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला आहे. जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी काल कबुतरांना दाणे टाकण्याच्या बाबतीत न्यायालयालाही जुमानणार नाही. वेळ पडल्यास धर्मरक्षणासाठी शस्त्रही हाती घेऊ. १३ ऑगस्टला आंदोलनाबाबत निर्णय घेऊ, असा इशारा दिला होता. त्यावर संताप उसळला आहे. मराठी एकीकरण समितीने जैन समाजाला प्रत्युत्तर म्हणून १३ ऑगस्टला दादरमध्ये आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे आणि कबुतरखाना कायमचा बंद झाला पाहिजे, अशी समितीची मागणी आहे.

## जरांगेंच्या मराठा आंदोलनासाठी दहा हजार गाड्यांचे बुकिंग

■ धाराशिव

**मराठा** आरक्षणाच्या मागणीसाठी २९ ऑगस्ट रोजी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या आझाद मैदानात नियोजित आंदोलनासाठी धाराशिव जिल्ह्यात जोरदार तयारी सुरू आहे. आंदोलनासाठी धाराशिव जिल्ह्यातून दहा हजार गाड्यांचे बुकिंग झाले आहे.

प्रत्येक गावामध्ये चावडी बैठका घेऊन मराठा बांधवांमध्ये जनजागृती केली जात आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांचा फोटो आणि चलो मुंबई असे बॅनर, पत्रके, छपाईचे काम सुरू असून, मोर्चाचा मार्ग आणि संदेश यावर भर देण्यात येत आहे. गावोगावी निघणाऱ्या



बैठकीतून चलो मुंबईचा नारा दिला जात असून, जिल्हाभरातून मोठ्या संख्येने मराठा बांधव या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे चित्र आहे.

## महागाई भत्त्यात २ टक्के वाढ

■ मुंबई

**राज्य** सरकारी कर्मचारी व इतर पात्र पूर्णवेळ कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याचा दर ५३ टक्क्यांवरून ५५ टक्के करण्याचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला. महागाई भत्त्यातील ही वाढ १ जानेवारी २०२५ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीतील थकबाकीसह ऑगस्ट महिन्याच्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी, असे या आदेशात म्हटले आहे. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्याबाबत विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे, त्याचप्रकारे लागू राहतील.

## भटके कुत्रे दिल्लीबाहेर घालवा सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

■ नवी दिल्ली

**दिल्ली** परिसरातील भटक्या कुत्र्यांना ताबडतोब पकडा, त्यांचे निर्बिजीकरण करा व त्यांची रवानगी त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या जागेत करा. एकही कुत्रा दिल्लीच्या रस्त्यावर दिसणार नाही, याची दक्षता घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली प्रशासनाला दिले आहेत. या कामामध्ये कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी आडकाठी आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशा सूचनाही न्यायालयाने दिल्या आहेत.

भटक्या कुत्र्यांचे लोकांवर हल्ले आणि रेबीज संसर्गाची



घटनांनंतर, सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून याची दखल घेत या प्रकरणाची सुनावणी सुरू केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जेबी पारडीवाला व न्यायमूर्ती आर महादेवन यांच्या पीठाने म्हटले » पान ७ वर

## दहीहंडी सरावादरम्यान ११ वर्षीय गोविंदाचा मृत्यू

■ मुंबई



**मुंबईत** दहीहंडी उत्सवाची जोरदार तयारी सुरू असताना, दहीसरच्या केतकीपाडा परिसरात दुर्दैवी घटना घडली. दहीहंडीच्या सरावादरम्यान ११ वर्षीय महेश रमेश जाधव या गोविंदाचा मृत्यू झाला.

महेश आपल्या पथकासोबत सरावात सहभागी झाला होता. सरावादरम्यान झालेल्या अपघातानंतर त्याला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, लहान गोविंदांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील दीड लाख गोविंदांचा १० लाख रुपयांपर्यंतचा विमा काढला आहे. या विम्याचे संरक्षण सरावापासून मिळावे, अशी मागणी गोविंदा पथकांनी नुकतीच केली आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावरचा महाराजा खड्ड्यांच्या विरोधात जनआक्रोशचे आंदोलन

■ पेण

**गेल्या** पंधरा वर्षांपासून रखडलेला आणि प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा ठरलेला मुंबई-गोवा महामार्गवरच जनआक्रोश समितीने यंदा गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाचा महाराजा या नावाने होणारे हे अनोखे आंदोलन केले जाणार आहे.

२०१० पासून सुरू असलेल्या या महामार्गाच्या कामादरम्यान आतापर्यंत ४,५३१ जणांचा मृत्यू झाला आहे. हे अपघात नसून सरकार आणि ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे झालेली हत्या आहे, असा संतप्त आरोप समितीने केला आहे. मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत आणि कुटुंबातील तरुणांना सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी देण्याची मागणी समितीने केली आहे. पनवेलजवळील पळस्पे येथे महामार्गावर सकाळी ११ वाजता पाटपूजन करून आंदोलनाचा श्रीगणेशा करण्यात आला. १७ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता पेण येथे पाद्यपूजन सोहळा, तर २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी सकाळी ११.३० वाजता लांजा येथे मूर्ती स्थापना करून उत्सवाची सुरुवात होईल.२८ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत महामार्गावरील पाली, संगमेश्वर, चिपळूण, खेड, पोलादपूर, लोणेरे, माणगाव, इंदापूर, कोलाड, नागोठणे आणि पळस्पे येथे महाआरतीचे आयोजन केले जाईल. हे आंदोलन ६ सप्टेंबरला मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी महाआरती आणि विसर्जनाने संपेल.

## राज ठाकरेंविरोधातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

■ दिल्ली

**मुंबईत** मराठी भाषा येत नसल्याच्या मुद्यामुळे परप्रांतीयांना मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणावरून वकील घनश्याम उपाध्याय यांनी मनसे प्रमुख राज ठाकरेंविरोधातील दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.

घनश्याम उपाध्याय यांनी काही दिवसांपूर्वी राज ठाकरेंविरोधातील याचिका थेट सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने नापसंती व्यक्त करत याचिकाकर्ते उच्च न्यायालयात का गेले नाहीत? सर्वोच्च न्यायालय सुट्टीवर आहे का? असा सवाल त्यांनी केला होता. त्यानंतर उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

उत्तर भारतीयांविरोधात राज ठाकरे यांनी केलेल्या विधानांमुळे सामाजिक वातावरण बिघडले असून, त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदवावा, अशी मागणी केली होती. पण न्यायालयाने ही याचिका केवळ प्रसिद्धीसाठी करण्यात आल्याचे म्हणत ती फेटाळली.

## शेअर बाजारात जोरदार तेजी दोन्ही निर्देशांकांत मोठी वाढ

■ मुंबई

**देशांतर्गत** शेअर बाजारात आज जोरदार तेजी दिसून आली. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २४,६०० च्या जवळ पोहोचला. तर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ७४६ अंकांनी वधारला.

निफ्टी २२१.७५ अंकांनी वाढून २४,५८५.०५ अंकांवर तर सेन्सेक्स ७४६.२९ अंकांच्या वाढीसह ८०,६०४.०८ अंकांवर बंद झाला. मुंबई शेअर बाजाराचे (बीएसई) मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांत अनुक्रमे ०.८ आणि ०.३५ टक्क्यांची वाढ झाली.

## मेधा पाटकरांची शिक्षा कायम सुप्रीम कोर्टाने याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**दिल्ली** उच्च न्यायालयाने दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्या बदनामी प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना सुनावलेली शिक्षा सर्वोच्च न्यायालयानेही कायम ठेवली आहे. त्यांचा दंड रद्द करण्यात आला आहे. त्यांना कारागृहात न राहता तीन वर्षांतून एकदा स्थानिक न्यायालयात हजेरी देण्याचे आदेशही कायम ठेवले आहेत.

मेधा पाटकर यांच्या वतीने सादर करण्यात आलेली आरोपातून व शिक्षेतून मुक्त करण्याची याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश व न्यायमूर्ती एन. कोटेश्वर सिंग यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करायला नकार दिला. सध्याचे दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना हे २००० साली एका खासगी संस्थेचे प्रमुख असताना मेधा पाटकर यांनी त्यांच्याविरोधात केलेल्या वक्तव्यामुळे पाटकर याच्यावर बदनामी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## राजे रघुजी भोसलेंची तलवार १८ ऑगस्टला महाराष्ट्रात

■ मुंबई

**नागपूरच्या** भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार लंडनमधून राज्य सरकारकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. ही तलवार राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याकडे लंडनमध्ये सुपूर्द करण्यात आली. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाघनख्यानंतर आता मराठा साम्राज्यातील आणखी एक मौलिक आणि ऐतिहासिक ठेवा महाराष्ट्रात येणार आहे. २९ एप्रिलला राज्य » पान ७ वर

## विरोधक हवेत बाण सोडतात! मुख्यमंत्री फडणवीसांचा टोला

**गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण**

■ लातूर

**महाराष्ट्रातील** आजचे विरोधक हवेत बाण सोडतात, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांनी केली. लातूर जिल्हा परिषद प्रांगणात लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, आमदार पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गोपीनाथ मुंडे आणि विलासराव देशमुख यांची मैत्री सर्वांना माहीत आहे. आज त्यांच्या पुतळ्याची उभारणी एकमेकांच्या शेजारी झाली आहे, हे विशेष आहे. महाराष्ट्रात विरोधी पक्षनेते कसे असावेत याचे गोपीनाथ मुंडे हे उदाहरण होते. त्यांनी कधीही आरोप मागे घेतले नाहीत. उलट समोरच्याचा राजीनामा घेऊनच थांबले. तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांना गोपीनाथ मुंडे झोपेतही दिसायचे. राजकारणाच्या, गुन्हेगारीकरणाच्या » पान ७ वर

## एअर इंडियाची दिल्ली-वॉशिंग्टन सेवा १ सप्टेंबरपासून तात्पुरती बंद

■ नवी दिल्ली

**काही** तांत्रिक कारणांमुळे एअर इंडियाने १ सप्टेंबरपासून दिल्ली - वॉशिंग्टन विमान सेवा तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याची घोषणा आज केली. ज्या प्रवाशांनी आगाऊ तिकीट आरक्षित केली असतील त्यांना तिकिटाचे पैसे परत केले जाणार आहेत.

दिल्ली - वॉशिंग्टन सेवेचे संचालन करण्याबाबतीत विविध अडचणी येत असल्याने कंपनीचा लौकिक आणि विश्वासार्हता टिकून राहावी या उद्देशाने दिल्ली - वॉशिंग्टन सेवा आम्ही तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करत आहोत, असे एअर इंडियाने आपल्या निवेदनात म्हटले आहे. एअर इंडियाच्या बोईंग स्टारलायनर विमानाला अहमदाबादमध्ये झालेल्या भीषण अपघातानंतर कंपनीने आपल्या ताफ्यातील २६ बोईंग ७८७-८ विमानांची संपूर्ण तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळेदेखील कंपनीला विमानांचा तुटवडा भासणार आहे. दिल्ली - वॉशिंग्टन सेवा स्थगित करण्यामागे हेही एक कारण आहे, असे निवेदनात पुढे म्हटले आहे.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

HDFC bank जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार 17500-35000, **7758908779** {NC251893}

मोठ्या प्रमाणात हाऊसकिपिंग पाहिजे. मुलुंड, कांदिवली, अंधेरी मालाड, संपर्क - **8097507698** {NC251899}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251890}

बदलापूर येथे घरासाठी 24 तास महिला हेल्पर पाहिजे. **8446201979** {NC251913}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (22,000-75,000) **9820628009 / 9833470199** {NC251844}

सुरक्षा रक्षकः १२ तास ₹ १४,०००/- माहीम, माटुंगा सेंट्रल **9137835512 / 9870002587** {NC251886}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251804}

सिक्युरिटीगार्ड पाहिजेत. ठाकुर्ली स्टेशनजवळ 12 तास 10000/- जाधव. **9820849329** {NC251900}

ई-मेल ट्विटर कॉम्प्युटर ऑपरेटर अनुभवी / पार्लरसाठी/ **9821570599** विलेपार्लेतील {NC251919}

मालाड वेस्टमध्ये इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार **9870041713.** {NC251836}

मोलकरीण, टिफिन सेवा, छोटा व्यवसाय वा नोकरी करणाऱ्यांसाठी ण्यासाठी घरबसल्या नोकरी. **7738447003** {NC251923}

### जाहिरातदारांना सुचना

**शनिवार दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी गोपाळकालानिमित्त दै.'नवाकाळ'चा जाहिरात विभाग बंद असल्याने रविवार दि. १७ ऑगस्ट आणि सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५च्या जाहिराती शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत 'नवाकाळ' कार्यालयात स्वीकारल्या जातील. याची जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.**
**advertise@navakal.in**
**- मॅनेजर 'नवाकाळ'**

## पाहिजेत

ड्रायव्हर पाहिजेत - वय 25 ते 35, बोरिवली राहणाऱ्यास प्राधान्य, महालक्ष्मी ज्वेलर्स, कार्टर रोड क्र. 3, बोरिवली पूर्व. संपर्क : **9820557734.** {NC251920}

अंधेरी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 10000 फोन - **7977596442** {NC251921}

इमिटेशन ज्वेलरीसाठी मुली पाहिजे. **7023506405** {NC251922}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC251851}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251713}

### वाचकांना सूचना


दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# हिंदीचे प्रसिद्ध कवी आणि गीतकार गोपालदास नीरज

**संजीव वेलणकर, पुणे**

**'बदन के जिसके शराफत का पैरहन देखा, वो आदमी भी यहाँ हमने बदचलन देखा' वा 'जब लगा कक्षाएं न लेने का आरोप' सारखी ग़जम्ल असो वा 'मानव होना भाग्य है, कवि होना सौभाग्य है' सारखा दोहा सादर करताना कविसंमेलनात कवी गोपालदास सक्सेना उर्फ नीरज यांचा प्रभाव असायचा. त्यांच्या कवितांमध्ये जीवनविषयक तत्त्वज्ञानाबरोबरच प्रगल्भतेची किनार होती. 'आज भले कुछ भी कह लो तुम, पर कल विश्व कहेगा सारा, नीरज से पहले गीतों में सबकुछ था पर प्यार नहीं था' असे आत्मविश्वासाने लिहिणारा कवी हिंदीत तरी सापडणारही नाही. बालपणातच आयुष्याच्या प्रवासाची सुरुवात कष्टप्रद झाली. सहाव्या वर्षी वडिलांचे छत्र हरपले.**

१९४२ च्या सुमारास कष्ट, अभ्यास, मेहनत या बलस्थानावर त्यांनी दहावीची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. त्यापुढील काळात इटवा या जिल्ह्याच्या ठिकाणी सरकारी कार्यालयात टायपिस्टची नोकरी लागली. सिनेमागृहाच्या दुकानावरही काम केले. १९५१ साली बी.ए. आणि हिंदी साहित्याची प्रथमश्रेणी संपादन केली. मेरठ येथे हिंदीचे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर त्यांनी प्राध्यापकी सोडली. नीरज यांची देवानंद यांच्यासोबतची मैत्री खास होती. देव आनंद यांनी लखनऊतील एका मुशायऱ्यात एका कवीच्या कविता ऐकल्या आणि त्यांना मुंबईला येण्यास सांगितले. व १९६०-७० च्या दशकात नीरज हे मुंबईत चित्रपट 'नई उमर की नई फसल'मधील गाणं लिहिण्यासाठी आले. त्यांनी शब्दांचं असं जाळे विणलं की, 'कारवां गुजर गया, गुबार देखते रहे' हे गाणे सुपरहिट झालं. नीरज यांचे 'कारवाँ गुजर गया..' हे गीत लोकप्रिय होण्याआधी याच नावाचा त्यांचा काव्यसंग्रह आला होता, जो साठच्या दशकात युवा पिढीत तुफान लोकप्रिय होता. नीरज यांना १९९१ साली पद्मश्री, तर २००७ साली पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. 'अब तो मजहब कोई ऐसा भी चलाया जाए, जिस में इंसान को इंसान बनाया जाए' ही त्यांची रचना प्रसिद्ध



आहे. देव आनंद यांनी नीरज यांना सचिनदांकडे नेले. रंगीला या शब्दापासून सुरू होणारे गाणे सचिन देव बर्मन यांना हवे होते. त्यातून नीरज यांनी लिहिले रंगीला रे तेरे रंग में.. हे सदाबहार गाणे हे सदाबहार गाणे; जे ५० वर्षांनंतरही तसेच ताजे टवटवीत वाटते. पुढे मग फुलों के रंगसे (पुजारी), लिखे जो खत तुझे तेरी यादमें (कन्यादान), खिलते है गुल यहाँ खिलके बिखडने को (शर्मिली), शोखियों में घोला जाय, फुलों का शबाब (प्रेम पुजारी), रंगीला रे मेरे रंग में (प्रेम पुजारी), दिल आज शायर है, गम आज नगमा है, शब ये गझल हौ ये सनम (गॅम्बलर), ए मैने कसम, तुने कसम ली (मेरे सपने), कैसे कहे हम, प्यार के गम को क्या क्या खेल दिखाले (शर्मिली), बस यही अपराध है हर बाद करता हूँ । आदमी हूँ आदमीसे प्यार करता हूँ (पहेचान) अशी अनेक गीते त्यांनी लिहिली. 'मेरा नाम जोकर' हा असाच एक सुपरहिट चित्रपट. त्यातील ए भाय, जरा देख के चलो, जीना यहाँ मरना यहाँ ही नीरज यांचे गीतलेखन सुपरडुपर झाले. एवढेच कशाला नीरज यांच्या आर. के.मधील दमदार प्रवासाची सुरुवात याच चित्रपटाने झाली. राज कपूर यांनी नीरज यांना लोणी काळभोर येथील राजबागेत बोलावले होते. राज कपूर रात्री उशिरापर्यंत जागणारे, सकाळी उशिरा उठणारे होते. एके दिवशी राज कपूर यांनी नीरज यांना पहाटे चार वाजताच उठवले. राजबागेत चक्कर मारत नीरज यांच्यासोबत गाण्याची चर्चा सुरू केली. नीरज घाबरले. शेतात भरपूर साप असल्याचे त्यांना कळले होते. या भीतीने, चर्चेने त्यांचे लक्ष नव्हते. राज कपूर यांना नीरज यांची अडचण समजली. परत बंगल्यावर आले तेव्हा या प्रसंगात सुचलेले गाणे 'ए भाय जरा देखके चलो' हे होते. प्रेम पुजारी, मेरा नाम जोकर, शर्मिली यांसारख्या चित्रपटांतील त्यांची गाणी गाजली तरी हे चित्रपट मात्र तिकीट बारीवर आपटले. नीरज यांचे मेरा नाम जोकर या चित्रपटातील 'ए भाय, जरा देख के चलो' हे गाणे अतिशय लोकप्रिय ठरले. या गाण्यासाठी त्यांना १९७२ मध्ये फिल्म फेअर पुरस्कार मिळाला. पण नीरज यांची गाणी घेतली की चित्रपट पडतो, अशी ओरड तेव्हा काहींनी सुरू केली. नीरज यांना एकूण तीन वेळा फिल्म फेअर अवार्डनेही सन्मानित करण्यात आलं होतं. तरी त्यांना मग काम मिळणे बंदच झाले. मग एके दिवशी सरळ बॅग भरून त्यांनी मुंबईला कायमचा रामराम ठोकला आणि इटावा या आपल्या मूळ गावी पुन्हा गेले. जगण्यासाठी त्यांना अनेक नोकऱ्या कराव्या लागल्या. ते सरकारी कार्यालयात टंकलेखक होते तसेच एका दुकानात विक्रेता म्हणूनही त्यांना काम करावे लागले. शेवटी मेरठच्या एका महाविद्यालयात हिंदीचे प्राध्यापक व नंतर विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले. १९९१ मध्ये पद्मश्री आणि २००७ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होतं. इंदूर येथील एका कविसंमेलनप्रसंगी कवी नीरज यांनी आपल्या आयुष्याचा खडतर प्रवास उलगडून सांगितला होता. ते म्हणत ''गंगाकिनारी आमचे घर होते, घरी खूप दारिद्र्य होते. लोक गंगेच्या पाण्यात चिल्लर नाणी टाकायचे. आम्ही भावंडं ते जमा करीत. घरी त्या पैशातून आम्हाला अन्न, पाणी मिळत असे. एकवेळेची भूक भागात असे.'' अनुवादाच्या माध्यमातून त्यांची कविता जगभरात पोहचली. हिंदीतील प्रख्यात कवी भदन्त आनंद कौसल्यायन त्यांना हिंदी साहित्यातील अश्वघोष मानतात, तर कवी दिनकर त्यांचा उल्लेख 'हिंदी साहित्यातील वीणा' असा करतात. हरिवंशराय बच्चन, ओशो हे त्यांच्या कवितांचे चाहते होते. ओशोचे त्यांच्याशी संबध जवळचे होते ओशो यांनी अखेरच्या काळात त्यांना बोलावून त्यांच्याशी दीर्घकाळ संवाद साधला होता. दर्द दिया है, आसावरी, मुक्तकी, कारवां गुजर गया.. (सर्व काव्यसंग्रह), लिख लिख भेजत पाती (पत्रलेखन), पंत-कला, काव्य और दर्शन (समीक्षा) ही त्यांची ग्रंथसंपदा.

# आदिती तटकरे व गिरीश महाजनांना १५ ऑगस्टच्या ध्वजारोहणाचा मान

■ मुंबई

नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीत निर्माण झालेला तिढा वाद अजूनही सुटलेला नाही. त्यामुळे स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी कोण ध्वजारोहण करणार, असा प्रश्न गेले काही दिवस विचारला जात होता. आज राज्य सरकारने परिपत्रक काढून १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी रायगड जिल्ह्यात मंत्री आदिती तटकरे आणि नाशिकमध्ये मंत्री गिरीश महाजन ध्वजारोहण करतील असे जाहीर केले आहे.

रायगडच्या पालकमंत्रिपदावर शिंदे गटाचे भरत गोगावले आणि राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे हक्क सांगत आहेत. नुकतीच दिल्लीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनील तटकरे यांच्यात बैठक झाली. मात्र तटकरे यांनी हक्क सोडण्यास नकार दिल्याचे कळते. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी भरत गोगावले यांच्या हस्ते रायगडमध्ये ध्वजारोहण व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली होती. पण सरकारच्या निर्णयामुळे गोगावले यांना धक्का बसला आहे.

नाशिकमध्ये भाजपाचे गिरीश महाजन आणि शिंदे सेनेचे दादा भुसे यांच्यात पालकमंत्रिपदासाठी चुरस आहे. दुसरीकडे कुंभमेळ्याचे महत्त्व लक्षात घेऊन पालकमंत्रिपद सोडण्यास भाजपाने नकार दिला आहे. तर दादा भुसे यांनीही पालकमंत्रिपदाची मागणी लावून धरली आहे. मात्र, आता ध्वजारोहणाचा मान गिरीश महाजन यांना दिल्याने दादा भुसे यांचा अपेक्षाभंग आहे.

# नेरुळच्या रुग्णालयात आग! जीवितहानी नाही

■ नवी मुंबई

नवी मुंबईच्या नेरुळ येथील सेक्टर ६ मध्ये असलेल्या सुश्रुषा रुग्णालयाच्या तळघरात आज सकाळी लागलेल्या आगीत कोणतीही हानी झाली नाही. आज सकाळी ११ वाजता ही आग लागल्यानंतर वरच्या मजल्यावर धूर पसरला. यावेळी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी सर्व रुग्णांना व इतरांना जवळच्या स्वामीनारायण मंदिरात सुरक्षित हलवले. अग्निशमन दलाने ही आग आटोक्यात आणली. रुग्णालयातील २१ रुग्णांना पनवेलला तर एका रुग्णाला इतर एकाला फोर्टिस रुग्णालयात हलवण्यात आले. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय प्रशासनाने म्हटले आहे. तळघरातील एसीमुळे ही आग लागली असावी, असे अग्निशमन दलाने म्हटले आहे.

# अण्वस्त्रे दाखवणे पाकची जुनी खोड! भारताचे सडेतोड उत्तर

■ नवी दिल्ली

पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर हे सध्या अमेरिका दौऱ्यावर आहेत. अमेरिकेत असतानाच त्यांनी भारताला अणुहल्ल्याची धमकी दिली आहे. यावर भारत सरकारने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत, अण्वस्त्रे दाखवणे ही पाकिस्तानची जुनी सवय आहे असे सडेतोड उत्तर दिले.

परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी अमेरिका दौऱ्यादरम्यान केलेल्या विधानाची आम्ही नोंद घेतली आहे. अणुधमक्या देणे ही पाकिस्तानची जुनी सवय असून, अशा बेजबाबदार विधानांवर आंतरराष्ट्रीय समुदाय स्वतः निष्कर्ष काढू शकतो. पाकिस्तान हा केवळ प्रादेशिक सुरक्षेसाठी नव्हे, तर जागतिक सुरक्षेसाठीही गंभीर धोका आहे.

यावेळी परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेचे नाव न घेता म्हटले की, या टिप्पण्या एका मित्र देशातून केल्या आहेत, हे खेदजनक आहे. भारत अण्वस्त्रांच्या धमक्यांना बळी पडणार नाही. आम्हाला स्वतःचे संरक्षण कसे करायचे हे माहीत आहे.

# न्यायाधीश परीक्षा देणारी तरूणी प्रवासादरम्यान गूढरित्या गायब

■ भोपाळ

दिवाणी न्यायाधीश पदासाठी परीक्षेची तयारी करत असलेली एक तरूणी रेल्वे प्रवासादरम्यान अचानक गायब झाल्याने खळबळ उडाली आहे. अर्चना तिवारी (२८) असे या तरुणीचे नाव आहे. ती इंदूर-बिलासपूर नर्मदा एक्स्प्रेस गाडीतून ७ ऑगस्ट रोजी इंदूरहून कटनी येथील आपल्या घरी येण्यासाठी निघाली होती. भोपाळ स्थानक येईपर्यंत ती आपल्या कुटुंबियांच्या फोनवरून संपर्कात होती. मात्र नंतर तिचा मोबाईल फोन बंद झाला. तिला घरी नेण्यासाठी कटनी स्थानकावर तिचे कुटुंबीय आले होते. रेल्वे गाडी कटनी स्थानकावर थांबली. परंतु अर्चना काही गाडीतून उतरली नाही. गाडी तशीच पुढे निघून गेल्यानंतर गोंधळलेल्या कुटुंबियांनी पुढील स्थानक उमारिया येथे राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांना फोन करून अर्चनाबद्दल सांगितले. गाडी उमारिया स्थानकात येताच नातेवाईकांनी अर्चना प्रवास करीत असलेल्या डब्यात जाऊन शोध घेतला असता तिची बॅग आढळून आली. मात्र तिचा कुठेच थांगपत्ता लागला नाही. अर्चना ही उच्चशिक्षित तरुणी असल्याने ती असे काही करेल असे तिच्या कुटुंबियांना वाटले नाही. पोलिसही या प्रकारामुळे गोंधळून गेले आहेत.

# आजचे राशी भविष्य

मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५
ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कामानिमित्त परदेश प्रवास घडू शकतो. घर सजावटीवर अत्याधुनिक खर्च कराल. स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक राहील. |
| वृषभ | आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. नवीन गुंतवणूक करण्याचे योजाल. कुटुंबियांचे सहकार्य चांगले राहील. |
| मिथुन | नोकरीमध्ये अधिकारप्राप्तीचे योग येतील. भावंडांचे सहकार्य राहील. घरी पाहुण्यांचे आगमन होईल. |
| कर्क | स्वतःसाठी चैनीच्या गोष्टी खरेदी कराल. नोकरीनिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. प्रिय व्यक्तींच्या गाठीभेटी होतील. |
| सिंह | महत्त्वाच्या कामांमध्ये अडचणी येऊ शकतात. रागावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. खर्चाचे प्रमाण वाढेल. |
| कन्या | अधिक उत्साहाने कार्यरत राहाल. कार्यक्षेत्रात सहकाऱ्यांची साथ राहील. मित्रमंडळींच्या भेटण्याने आनंद मिळेल. |
| तूळ | व्यवसायामध्ये बुद्धी व परिश्रमाने यश मिळवाल .विरोधकांवर मात करण्यात यशस्वी व्हाल. नोकरीमध्ये नवीन जबाबदारी स्वीकारावी लागेल. |
| वृश्चिक | काही घटना मनाविरुद्ध घडू शकतात त्याचा ताण जाणवेल. नोकरीनिमित्त प्रवास घडू शकतो. आर्थिक नुकसान होण्याची शक्यता राहील. |
| धनु | मालमत्तेसंबंधीची कामे लांबणीवर पडतील. घरातील ज्येष्ठ मंडळींची काळजी वाटेल. जोडीदाराच्या म्हणण्याप्रमाणे वागावे लागेल. |
| मकर | व्यवसायानिमित्त छोटा प्रवास घडू शकतो. विवाहास उत्सुक मंडळींना विवाहाचे प्रस्ताव येतील. काहींना आरोग्याच्या तक्रारी उद्भवतील. |
| कुंभ | आर्थिक व्यवहार काही कारणाने लांबणीवर पडू शकतात. नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. संततीचे सौख्य लाभेल. |
| मीन | अधिक उत्साहाने कार्यरत राहाल. तुम्ही केलेल्या योजनांमध्ये सफलता मिळेल. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राहील. |


## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत दर सोमवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 32 • सोडत दिनांक 11/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख — **SL-09 : 7173**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **5013**
लॉटरी भांडार - नागपूर
महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर
प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1300 | 2270 | 2490 | 3963 | 4335 | 4402 | 4571 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2186 | 3625 | 3649 | 4045 | 5119 | 5369 | 6363 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2184 | 3281 | 5691 | 5736 | 6544 | 6960 | 7959 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 2931 | 3197 | 3367 | 3411 | 5370 | 5371 | 5773 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1795 | 2275 | 2851 | 3333 | 3822 | 4494 | 5002 | 5557 | 6219 | 6674 | 7147 | 7567 |
| | | 1801 | 2277 | 2867 | 3339 | 3831 | 4499 | 5047 | 5560 | 6228 | 6676 | 7157 | 7576 |
| | | 1810 | 2283 | 2882 | 3340 | 3832 | 4501 | 5055 | 5561 | 6274 | 6687 | 7159 | 7580 |
| 1000 | 1293 | 1812 | 2299 | 2883 | 3341 | 3834 | 4504 | 5059 | 5564 | 6301 | 6688 | 7170 | 7584 |
| 1004 | 1314 | 1833 | 2320 | 2884 | 3343 | 3865 | 4525 | 5066 | 5567 | 6322 | 6689 | 7171 | 7586 |
| 1010 | 1338 | 1846 | 2348 | 2887 | 3351 | 3872 | 4534 | 5072 | 5568 | 6330 | 6694 | 7173 | 7587 |
| 1031 | 1351 | 1856 | 2352 | 2899 | 3352 | 3888 | 4557 | 5074 | 5569 | 6336 | 6695 | 7193 | 7597 |
| 1067 | 1353 | 1913 | 2402 | 2922 | 3359 | 3893 | 4558 | 5079 | 5581 | 6361 | 6696 | 7196 | 7599 |
| 1104 | 1361 | 1916 | 2412 | 2923 | 3363 | 3900 | 4592 | 5085 | 5592 | 6362 | 6755 | 7217 | 7617 |
| 1107 | 1368 | 1919 | 2415 | 2924 | 3367 | 3916 | 4618 | 5100 | 5595 | 6381 | 6769 | 7224 | 7663 |
| 1113 | 1374 | 1920 | 2438 | 2928 | 3374 | 3930 | 4619 | 5104 | 5599 | 6404 | 6776 | 7240 | 7666 |
| 1129 | 1377 | 1980 | 2448 | 2932 | 3386 | 3935 | 4633 | 5105 | 5608 | 6410 | 6802 | 7244 | 7673 |
| 1134 | 1389 | 1989 | 2455 | 2935 | 3405 | 3959 | 4644 | 5116 | 5643 | 6433 | 6833 | 7262 | 7675 |
| 1136 | 1394 | 1990 | 2474 | 2969 | 3414 | 3971 | 4649 | 5119 | 5684 | 6438 | 6834 | 7279 | 7692 |
| 1137 | 1411 | 1991 | 2502 | 2981 | 3431 | 3976 | 4660 | 5125 | 5696 | 6444 | 6835 | 7299 | 7716 |
| 1142 | 1419 | 1995 | 2503 | 2998 | 3443 | 3995 | 4692 | 5156 | 5701 | 6447 | 6862 | 7301 | 7723 |
| 1145 | 1431 | 2002 | 2524 | 3003 | 3453 | 4001 | 4709 | 5165 | 5750 | 6451 | 6866 | 7308 | 7733 |
| 1146 | 1434 | 2026 | 2535 | 3029 | 3462 | 4015 | 4744 | 5184 | 5757 | 6462 | 6868 | 7339 | 7757 |
| 1151 | 1441 | 2042 | 2555 | 3044 | 3475 | 4042 | 4785 | 5195 | 5758 | 6464 | 6899 | 7360 | 7762 |
| 1152 | 1508 | 2045 | 2576 | 3076 | 3487 | 4094 | 4793 | 5204 | 5880 | 6466 | 6906 | 7363 | 7769 |
| 1158 | 1522 | 2062 | 2578 | 3093 | 3488 | 4095 | 4794 | 5209 | 5904 | 6468 | 6915 | 7376 | 7778 |
| 1159 | 1553 | 2080 | 2591 | 3103 | 3503 | 4146 | 4798 | 5216 | 5905 | 6489 | 6918 | 7384 | 7782 |
| 1160 | 1557 | 2089 | 2592 | 3111 | 3507 | 4170 | 4812 | 5223 | 5916 | 6499 | 6939 | 7389 | 7784 |
| 1162 | 1560 | 2140 | 2620 | 3113 | 3521 | 4189 | 4826 | 5253 | 5917 | 6517 | 6940 | 7408 | 7785 |
| 1166 | 1585 | 2141 | 2622 | 3124 | 3548 | 4205 | 4843 | 5268 | 5946 | 6526 | 6942 | 7414 | 7786 |
| 1168 | 1592 | 2149 | 2633 | 3131 | 3573 | 4243 | 4849 | 5275 | 5947 | 6540 | 6963 | 7431 | 7794 |
| 1174 | 1600 | 2176 | 2657 | 3133 | 3578 | 4245 | 4858 | 5282 | 5959 | 6549 | 6964 | 7435 | 7822 |
| 1181 | 1628 | 2185 | 2719 | 3153 | 3607 | 4248 | 4862 | 5332 | 5988 | 6568 | 6974 | 7456 | 7824 |
| 1182 | 1629 | 2192 | 2724 | 3183 | 3621 | 4339 | 4874 | 5363 | 6004 | 6607 | 6986 | 7457 | 7827 |
| 1194 | 1639 | 2195 | 2744 | 3219 | 3638 | 4340 | 4877 | 5379 | 6011 | 6619 | 6990 | 7461 | 7842 |
| 1196 | 1655 | 2205 | 2766 | 3223 | 3679 | 4361 | 4878 | 5393 | 6040 | 6620 | 6996 | 7471 | 7847 |
| 1199 | 1679 | 2206 | 2772 | 3252 | 3683 | 4403 | 4903 | 5429 | 6047 | 6624 | 7000 | 7472 | 7877 |
| 1201 | 1687 | 2244 | 2783 | 3268 | 3736 | 4410 | 4924 | 5446 | 6070 | 6626 | 7017 | 7480 | 7878 |
| 1214 | 1690 | 2250 | 2808 | 3283 | 3742 | 4440 | 4927 | 5464 | 6088 | 6638 | 7047 | 7483 | 7900 |
| 1217 | 1692 | 2259 | 2825 | 3303 | 3744 | 4441 | 4960 | 5467 | 6108 | 6641 | 7049 | 7507 | 7909 |
| 1241 | 1695 | 2268 | 2827 | 3304 | 3762 | 4450 | 4966 | 5503 | 6150 | 6648 | 7072 | 7517 | 7963 |
| 1271 | 1719 | 2271 | 2829 | 3315 | 3765 | 4475 | 4984 | 5506 | 6159 | 6661 | 7079 | 7524 | 7970 |
| 1272 | 1739 | 2272 | 2836 | 3322 | 3771 | 4477 | 4986 | 5528 | 6192 | 6663 | 7088 | 7527 | 7974 |
| 1280 | 1750 | 2273 | 2844 | 3332 | 3803 | 4485 | 4993 | 5552 | 6206 | 6669 | 7103 | 7531 | 7977 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी • धनलक्ष्मी विकली लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 11/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SL-06 : 2505**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1528 | 1567 | 1864 | 2239 | 2677 | 3074 | 4745 | 5534 | 5760 | 5955 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1951 | 2190 | 2215 | 2889 | 3694 | 3921 | 4390 | 4597 | 5391 | 5426 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1091 | 2221 | 3236 | 4281 | 4737 |
| 1147 | 2262 | 3325 | 4334 | 4784 |
| 1270 | 2560 | 3376 | 4407 | 5055 |
| 1397 | 2592 | 3454 | 4425 | 5116 |
| 1471 | 2596 | 3633 | 4449 | 5129 |
| 1541 | 2626 | 3652 | 4453 | 5230 |
| 1583 | 2650 | 3658 | 4454 | 5349 |
| 1726 | 2685 | 3795 | 4547 | 5457 |
| 1850 | 3031 | 3835 | 4590 | 5512 |
| 2036 | 3038 | 3916 | 4638 | 5575 |
| 2070 | 3095 | 4163 | 4649 | 5828 |
| 2080 | 3211 | 4211 | 4678 | 5856 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 11/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-00 : 0061** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0094 | 1335 | 3031 | 3177 | 3595 | 4714 | 7011 | 7648 | 8121 | 8909 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0579 | 1349 | 1642 | 3681 | 5522 | 6688 | 8446 | 9205 | 9457 | 9579 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0067 | 0716 | 1228 | 1531 | 1611 | 6734 | 7817 | 8190 | 9899 | 9929 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 300/- | 1049 | 2276 | 3343 | 4418 | 5390 | 6148 | 6697 | 7636 | 8336 | 9292 |
| 0005 | 1104 | 2289 | 3363 | 4469 | 5420 | 6206 | 6714 | 7670 | 8371 | 9297 |
| 0009 | 1111 | 2311 | 3369 | 4534 | 5425 | 6226 | 6814 | 7711 | 8388 | 9342 |
| 0020 | 1135 | 2348 | 3388 | 4704 | 5494 | 6266 | 6832 | 7714 | 8505 | 9373 |
| 0078 | 1166 | 2392 | 3424 | 4724 | 5500 | 6267 | 6861 | 7717 | 8574 | 9392 |
| 0092 | 1185 | 2549 | 3505 | 4740 | 5506 | 6285 | 6865 | 7749 | 8585 | 9421 |
| 0094 | 1191 | 2655 | 3540 | 4774 | 5530 | 6356 | 6879 | 7752 | 8587 | 9479 |
| 0201 | 1210 | 2683 | 3637 | 4886 | 5550 | 6363 | 7014 | 7756 | 8806 | 9586 |
| 0449 | 1242 | 2694 | 3696 | 4914 | 5557 | 6395 | 7020 | 7773 | 8815 | 9593 |
| 0567 | 1310 | 2753 | 3841 | 4920 | 5561 | 6461 | 7025 | 7817 | 8839 | 9608 |
| 0614 | 1319 | 2784 | 3928 | 4943 | 5565 | 6567 | 7067 | 7857 | 8885 | 9674 |
| 0659 | 1329 | 2822 | 3951 | 5007 | 5577 | 6611 | 7116 | 7884 | 8898 | 9687 |
| 0665 | 1409 | 2842 | 3973 | 5090 | 5645 | 6617 | 7207 | 7888 | 8914 | 9724 |
| 0802 | 1739 | 2850 | 4014 | 5141 | 5706 | 6624 | 7219 | 7889 | 9030 | 9748 |
| 0829 | 1789 | 3083 | 4023 | 5168 | 5793 | 6625 | 7236 | 7909 | 9044 | 9755 |
| 0838 | 1913 | 3100 | 4146 | 5191 | 5922 | 6636 | 7270 | 7945 | 9082 | 9761 |
| 0843 | 2095 | 3224 | 4185 | 5206 | 5935 | 6666 | 7315 | 7974 | 9099 | 9796 |
| 0851 | 2220 | 3280 | 4212 | 5224 | 6002 | 6668 | 7427 | 7988 | 9131 | 9821 |
| 0953 | 2221 | 3289 | 4224 | 5225 | 6015 | 6681 | 7468 | 8040 | 9196 | 9961 |
| 0990 | 2253 | 3333 | 4343 | 5355 | 6021 | 6686 | 7501 | 8214 | 9224 | 9965 |
| 1045 | 2261 | 3334 | 4364 | 5386 | 6062 | 6691 | 7574 | 8254 | 9290 | 9982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 11/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-06 : 5435**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1039 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 1499 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 7871 | 8220 | 9718 |

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0052 | 0335 | 0369 | 0573 | 0998 | 3170 | 3938 | 6955 | 6994 | 9388 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0065 | 0229 | 0560 | 0681 | 2201 | 3626 | 4052 | 8198 | 8796 | 8903 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0004 | 1340 | 2166 | 3300 | 4017 | 5103 | 5941 | 7277 | 8160 | 8868 |
| 0085 | 1390 | 2222 | 3303 | 4104 | 5115 | 6013 | 7349 | 8218 | 8909 |
| 0285 | 1601 | 2377 | 3321 | 4421 | 5163 | 6065 | 7371 | 8280 | 8922 |
| 0467 | 1717 | 2423 | 3333 | 4469 | 5194 | 6426 | 7496 | 8285 | 8989 |
| 0702 | 1719 | 2564 | 3407 | 4477 | 5213 | 6497 | 7543 | 8408 | 9269 |
| 0813 | 1759 | 2627 | 3457 | 4615 | 5242 | 6582 | 7710 | 8451 | 9372 |
| 0895 | 1789 | 2680 | 3511 | 4636 | 5254 | 6584 | 7724 | 8516 | 9409 |
| 0944 | 1797 | 2729 | 3637 | 4814 | 5320 | 6617 | 7751 | 8564 | 9608 |
| 1004 | 1912 | 2791 | 3769 | 4854 | 5333 | 6678 | 7771 | 8648 | 9671 |
| 1067 | 1923 | 2826 | 3881 | 4879 | 5461 | 6761 | 7898 | 8650 | 9824 |
| 1091 | 1963 | 3169 | 3887 | 4914 | 5525 | 6858 | 7907 | 8735 | 9897 |
| 1185 | 2066 | 3190 | 3902 | 4944 | 5547 | 6998 | 7945 | 8780 | 9911 |
| 1193 | 2123 | 3221 | 3959 | 5005 | 5593 | 7177 | 7972 | 8782 | 9924 |
| 1319 | 2151 | 3235 | 3997 | 5050 | 5831 | 7275 | 8148 | 8788 | 9974 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


## शुभ राशी दि. १२/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ३ |
| १० | ६० | ३० |
| १५ | ६५ | ३५ |
| १४६ | १६९ | १३९ |
| २९० | ३४९ | ४९० |

## पदासाठी स्त्री-पुरुष भेद नको! सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

■ नवी दिल्ली

**कोणत्याही** पदासाठी त्या व्यक्तीची पात्रता महत्त्वाची असून त्यामध्ये स्त्री-पुरुष असा भेद करता येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भारतीय लष्करातील जज ॲडव्होकेट जनरल अर्थात सैनिकी कायदा सल्लागार या पदासाठी पुरुषांसाठी ६ तर महिलांसाठी ३ जागा ठेवण्याचा केंद्राचा निर्णय न्यायालयाने रद्दबातल ठरवला आहे. या पदासाठी एकत्रित गुणवत्ता यादी तयार करण्याचे निर्देश न्यायालयाने केंद्राला दिले आहेत.



जज ॲडव्होकेट जनरल या पदासाठीच्या गुणवत्ता यादीत दोन महिला अधिकारी अनुक्रमे चौथ्या व पाचव्या आल्या होत्या. मात्र २०२३ च्या नियमानुसार ६ जागा पुरुषांना तर ३ जागा महिलांना राखीव असल्याने त्यांना हे पद मिळाले नव्हते. त्याविरोधात त्या न्यायालयात गेल्या. या खटल्याच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपांकर दत्ता व न्या. मनमोहन यांच्या पीठाने म्हटले की, सरकार अशा प्रकारे पुरुषांसाठी ६ जागा आरक्षित करू शकत नाही. या पदासाठी पुरुषांना ६ व महिलांना ३ जागा देण्याची प्रथा चालत आलेली आहे. ती निश्चित आहे असे म्हणता येणार नाही. स्त्री-पुरुष समानता व २०२३ च्या नियमानुसार केवळ योग्य व पात्र उमेदवाराला पद मिळाले पाहिजे. महिलांना जागा नाकारणे हे स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाचे उल्लंघन आहे. केंद्र सरकारने समानतेच्या तत्वानुसार भरती प्रक्रिया राबवावी व महिला व पुरुष उमेदवारांची एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिद्ध करावी.

देश विदेश

## कराचीत डम्परची दुचाकीला धडक! दोन भावंडांचा मृत्यू

■ कराची

**कराचीच्या** रशीद मिन्हास रोडवरील लकी वन मॉलजवळ डम्परने दुचाकीला धडक दिल्यामुळे दोन भावंडांचा मृत्यू झाला. त्यांचे वडील जखमी झाले. या अपघातानंतर परिसरातील लोकांनी केलेल्या निदर्शनादरम्यान हिंसाचार झाला. ज्यामुळे शहरातील प्रमुख मार्गांवरील वाहतूक विस्कळीत झाली.

महनूर (२२ ) आणि अहमद रझा (१४) अशी मृत भावांची नावे आहे. शकीर (४८) असे जखमी (वडील) व्यक्तीचे नाव आहे. वरिष्ठ पोलीस अधीक्षक झीशान शफीक सिद्दीकी यांनी सांगितले की, आज पहाटे ३.१५ वाजता डम्परने दुचाकीला धडक दिली. या अपघातानंतर स्थानिक लोकांनी डम्परवर दगडफेक करून आग लावली.

## चाड देशाचे माजी पंतप्रधान मासरा यांना २० वर्षांची शिक्षा

■ एन'जामेना

**मध्य** आफ्रिकेतील चाडचे माजी पंतप्रधान आणि विरोधी नेते सक्सेस मासरा यांना देशाच्या गुन्हेगारी न्यायालयाने २० वर्षांची शिक्षा सुनावली. त्यांना १.८ दशलक्ष डॉलरचा दंडही ठोठावला. कोर्टरूममधून बाहेर पडण्यापूर्वी मसरा यांनी आपल्या समर्थकांना खंबीर राहून शांतता पाळा, असा संदेश दिला. त्यांना द्वेष पसरवणे, लोकांना भडकावणे आणि हत्येतील सहभागाच्या आरोपाखाली दोषी ठरवण्यात आले. मे महिन्यात शेतकरी आणि गुराखी यांच्यात झालेल्या प्राणघातक संघर्षानंतर हे आरोप करण्यात आले होते. ते या शिक्षेविरुद्ध अपील करतील, असे मासरा यांचे वकील काडजिलेम्बे फ्रान्सिस यांनी पत्रकारांना सांगितले.

## त्रिस्सुरचे भाजपाचे खासदार हरवल्याची तक्रार दाखल

■ कोची

**त्रिस्सुरचे** भाजपाचे खासदार व सिनेअभिनेते सुरेश गोपी मतदारसंघात येत नाहीत. कोणताही संपर्क ठेवत नाहीत. त्यामुळे ते हरवले असल्याची तक्रार युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. त्यातच दोन ननच्या अटक प्रकरणात त्यांनी मौन बाळगल्यामुळे त्यांच्या विरोधात नाराजी वाढली आहे.

केरळचे शिक्षणमंत्री व्ही. सेवाकुट्टी यांनी गोपी यांच्यावर समाजमाध्यमावर उपहासात्मक टीका केली त्यावर मतदारसंघातील अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. गोपी हे २०१९ पासून त्रिस्सुरचे खासदार आहेत. त्यांनी मतदारसंघात निवडणूक प्रचारात अनेक आश्वासने दिली. मात्र त्यांची पूर्तता केली नाही. ते स्वतःहून उपलब्ध होत नाहीत. त्यांच्याशी संपर्कही साधता येत नाही. नन प्रकरणात बजरंग दलाच्या तक्रारीवरून या दोन्ही ननच्या विरोधात मानवी तस्करीचे आरोप लावण्यात आले. केरळच्या जवळजवळ सर्वच खासदारांनी या घटनेचा निषेध केला असून केवळ गोपी यांनीच यावर मौन बाळगले आहे.

## आग्र्यात महाराजांच्या स्मारकासाठी पहिला हप्ता

■ लखनौ

**छत्रपती** शिवाजी महाराजांच्या आग्रा येथील स्मारकासाठी उत्तर प्रदेश सरकारने निधीचा पहिला हप्ता दिला आहे. ९.४६ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाच्या जमीन खरेदीसाठी हा पहिला हप्ता आहे.

फेब्रुवारी महिन्यात शिवजयंतीला आग्र्यात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचे सूतोवाच केले होते. आग्र्यातील कोठी मिना बाजार येथे हे स्मारक उभारण्यात येणार आहे. यासाठी २,९४६ चौरस मीटर जागा विकत घेण्यात येणार आहे. यामध्ये काही घरे व टेकड्या आहेत. स्मारकासाठीच्या या जागेबाबत सध्या विविध न्यायालयीन वाद सुरू आहेत.

## चीनचे उच्चपदस्थ राजदूत लिऊ जियानचाओ यांना अटक

■ बीजिंग

**बीजिंगमधील** अधिकाऱ्यांनी चीनचे उच्चपदस्थ राजदूत लिऊ जियानचाओ यांना अटक केली. चीनच्या परराष्ट्र धोरणांमधील मुख्य चेहरा असलेले लिऊ परराष्ट्र मंत्रिपदाच्या शर्यतीत देखील होते. या मोठ्या राजकीय घडामोडींदरम्यान परराष्ट्र दौऱ्यावरून परतल्यानंतर लगेचच त्यांना अटक करण्यात आल्यामुळे चीनमध्ये खळबळ उडाली.

लिऊ यांच्यावर परदेशी राजकीय पक्षांशी संबंध व्यवस्थापित करण्याची जबाबदारी होती. २०२२ मध्ये ही पदावर आल्यानंतर त्यांनी २० हून अधिक देशांना भेटी दिल्या आणि १६० हून अधिक देशांच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांच्या व्यस्त परराष्ट्र दौऱ्यामुळे आणि वॉशिंग्टनमध्ये माजी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन यांच्याशी झालेल्या बैठकीमुळे अशा चर्चा सुरू होत्या की, त्यांना पुढील परराष्ट्र मंत्री बनवण्याची तयारी सुरू आहे. त्यांच्या अटकेला आतापर्यंतची



सर्वोच्च पातळीवरील राजनैतिक चौकशी म्हणून पाहिले जात आहे. चीनच्या ईशान्य प्रांत जिलिनमध्ये जन्मलेल्या लिऊ यांनी बीजिंग फॉरेन स्टडीज विद्यापीठातून इंग्रजीत पदवी प्राप्त केली आणि ऑक्सफर्ड विद्यापीठातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यास केला. त्यानंतर त्यांनी परराष्ट्र मंत्रालयात अनुवादक म्हणून पहिले पद स्वीकारले.

## वाकोल्यातील झोपडपट्टीत 'मलेरिया'चे थैमान

घराघरांत लागण

■ मुंबई

**वाकोल्यातील** अनेक झोपडपट्ट्या वस्त्यांमध्ये मलेरिया साथीच्या आजाराने थैमान घातले आहे. त्यात भरीस भर म्हणून सर्दी, खोकला यांनीही डोके वर काढले आहे. घराघरांत ही लागण झाल्याचे दिसून येत आहे. पालिकेने येथे किटकनाशक, धूर फवारणी करावी, अशी मागणी स्थानिक करत आहेत.

येथील मद्रासवाडी, वाघरी वाडा, श्रीकृष्ण नगर, लालमैदान, आग्रीपाडा आदि भागात मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या आहेत. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार जागोजागी तुंबलेली गटारे, सार्वजनिक शौचालयात अस्वच्छता, कचऱ्यांचे साम्राज्य यामुळे मच्छरांचा फैलाव झाला आहे. किटकनाशक, धूर फवारणी व परिसरात स्वच्छता या तक्रारींकडे पालिका ढुंकूनही पाहत नाही. साथीच्या आजाराने एखाद्याचा बळी गेल्यावर पालिका जागी होईल का? असा संतप्त सवाल रहिवाशी विचारत आहेत.

## मुंबईतील गणेशोत्सव मंडळांची उद्धव ठाकरेंसोबत आज बैठक

■ मुंबई

**गणेशोत्सव** काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. मुंबई महानगरपालिका आणि सरकारने मुंबईतील गणेशोत्सव मंडळांच्या अनेक समस्या अद्याप सोडवलेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची उद्या उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत बैठक होणार आहे.

उबाठा आमदार अनिल परब आणि शिवसेना उपनेते विनोद घोसाळकर यांच्या पुढाकाराने ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. सायंकाळी ६ वाजता वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात ही बैठक पार पडेल. गणपती मूर्तींचे विसर्जन, मंडप उभारणीवरील अटी-शर्ती अशा विविध विषयांवर गणेशोत्सव मंडळांसोबत सविस्तर चर्चा होणार आहे.

## वडाळा-कासारवडवली मेट्रो ४ मार्गिकेचे ८४ टक्के काम पूर्ण

■ मुंबई

**वडाळा** ते कासारवडवली या मेट्रो ४ मार्गिकेचे काम वेगाने सुरू असून, आतापर्यंत सुमारे ८४.५ टक्के काम पूर्ण झाले आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) घाटकोपर पूर्व भागातील पंतनगर-घाटकोपर बस स्थानकावर ४५० टन वजनाचा स्टील स्पॅन बसवण्याचे काम पूर्ण केले.



५८ मीटर लांब, ३.१ मीटर उंच आणि ४५० टन वजनाचा हा स्पॅन पाच स्टील गर्डरपासून बनवण्यात आला आहे. या मार्गिकेची एकूण लांबी ३२.३२ किलोमीटर असून, ३२ स्थानके उभारण्यात येणार आहेत. प्रकल्पासाठी १४,५४९ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता. एकूण पाच पॅकेजमध्ये काम सुरू असून, या मार्गिकेचे काम २०१८ मध्ये सुरू झाले. एमएमआरडीएच्या २०२० च्या नियोजनानुसार हा प्रकल्प ऑक्टोबर २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. पण कोरोना काळात लॉकडाऊनसह इतर कारणांमुळे काम संथ झाले. शिवाय पॅकेज ८, पॅकेज १० आणि पॅकेज १२ चे काम कंत्राटदारांच्या आर्थिक अडचणींमुळे काही महिन्यांपासून ठप्प होते. त्यातून काम रखडले असले, तरी सध्या एमएमआरडीएने प्रकल्पाला पुन्हा गती दिली आहे. सध्या या मार्गिकेचा पहिला टप्पा लवकरात लवकर वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

ठाण्यातील बहुप्रतीक्षित मेट्रो सेवेची चाचणी पुढील महिन्यात घेण्याचे प्रयत्न सुरू असून, डिसेंबरपर्यंत पूर्ण सेवा सुरू होण्याची शक्यता असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## तुर्कीयेमध्ये शक्तिशाली भूकंप १ ठार! ३० हून अधिक जखमी

■ अंकारा

**तुर्कीयेच्या** पश्चिम भागात काल रात्री झालेल्या शक्तिशाली भूकंपात एका व्यक्तीचा बळी गेला असून, तीसहून अधिक जखमी झाले आहेत. या भूकंपाची तीव्रता ६.१ रिश्टर एवढी होती. तुर्कीयेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने ही माहिती दिली.

इस्तंबूलपासून वायव्येकडे २०६ किलोमीटर, बुरसापासून १२८ किलोमीटर आणि बालिकेसीरच्या आग्नेयेकडे ५१ किलोमीटर अंतरावर जमिनीखाली सुमारे १० ते ११ किलोमीटर खोलीवर या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. या भूकंपाचे हादरे इस्तंबूल आणि आसपासच्या प्रातांमध्ये जाणवले. तातडीने आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि अन्य संबंधित विभागांना याची माहिती देण्यात आली. परिस्थितीवर सरकार बारकाईने लक्ष ठेवून आहे, अशी माहिती तुर्कीयेचे गृहमंत्री अली येरलिकाया यांनी दिली.

## सिंधुदुर्गात पुन्हा लम्पीचा विळखा! ८ जनावरे दगावली! ६०० बाधित

■ सिंधुदुर्ग

**जिल्ह्यात** लम्पी त्वचारोगाने पुन्हा डोके वर काढले असून, आतापर्यंत ६०० जनावरांना लागण झाली आहे, तर ८ जनावरे दगावली आहेत. गेल्या १५ दिवसांपासून या रोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे शेतकरी आणि पशुपालकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



२०२३ साली जिल्ह्यात ६ हजारांहून अधिक जनावरे बाधित होऊन २०० हून अधिक जनावरे मृत्यूमुखी पडली होती. यंदा जूनच्या सुरुवातीला कुडाळ, सावंतवाडी तालुक्यातील काही गावांमधून प्रादुर्भाव सुरू झाला. जिल्हा परिषद आणि राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने लसीकरण मोहीम सुरू केली असली तरी खरीप हंगामाच्या तोंडावर रोग वाढल्याने शेतकरी चिंतेत आहेत. जिल्ह्यातील ७५ हजार जनावरांचे लसीकरण पूर्ण झाले असून, सध्या ४१८ जनावरे बरी झाली, १७५ वर उपचार सुरू आहेत. तरीही ४० टक्के जनावरांचे लसीकरण बाकी आहे. अधिकारी व कर्मचारीसंख्या अपुरी असल्याने उपाययोजना अंमलबजावणीत अडचणी येत असल्याचे जिल्हा प्रशासनाने मान्य केले आहे.

## मुंबई-अहमदाबाद मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे महिलेचा मृत्यू

■ पालघर

**मुंबई-अहमदाबाद** राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे पालघरच्या छाया पुरव यांना आपला जीव गमवावा लागला आहे. रस्त्यावरील खड्डे यामुळे आजवर अनेकांना प्राण गमवावे लागले आहेत. पण रुग्णवाहिका वेळेवर रुग्णालयात न पोहोचल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.

छाया पुरव आपल्या घराजवळ असताना त्यांच्या डोक्यावर झाडाची फांदी पडली. या अपघातात त्यांना डोक्याला, खांद्याला आणि मणक्याला गंभीर दुखापत झाली. तातडीच्या उपचारांसाठी स्थानिक रुग्णालयाने त्यांना मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. पालघर-मुंबई हे सुमारे १०० किमी अंतर अडीच तासांत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, महामार्गावरील कोंडीमुळे रुग्णवाहिका तब्बल ३ तास एका ठिकाणीच अडकली. प्रकृती नाजूक झाल्याने वाटेतच मीरा रोड येथील ऑर्बिट रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. येथून हिंदुजा रुग्णालय केवळ ३० किमी अंतरावर असतानाच डॉक्टरांनी छाया पुरव यांना मृत घोषित केले.

## सातार्‍यात ज्येष्ठ नागरिक संघाचा डॉल्बीला विरोध

जिल्हाधिकाऱ्याची भेट घेतली

■ अंकारा

**गणेशोत्सवात** डॉल्बीला संपूर्ण बंदी घालावी या मागणीसाठी साताऱ्यातील ज्येष्ठ नागरिक संघांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. जिल्ह्यातील पाच ज्येष्ठ नागरिक संघांचे सुमारे ५० सदस्य जिल्हाधिकारी संतोष पाटील यांना भेटले व निवेदन सादर करून डॉल्बी बंदीचा ठाम आग्रह धरला.

डॉ. कर्मवीर मार्तंडराव सूर्यवंशी चाचा फाऊंडेशन, शाहूनगर ज्येष्ठ नागरिक संस्था, अजिंक्य ज्येष्ठ नागरिक संघ, पूर्वा ज्येष्ठ नागरिक संघ, समता ज्येष्ठ नागरिक संघ व जगतापवाडी ज्येष्ठ नागरिक संघ या संस्थांनी या आंदोलनात सहभाग घेतला. डॉल्बीमुळे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रकृतीवर होणारा अपाय लक्षात घेऊन जिल्ह्यात त्यास बंदी घालावी, अशी मागणी करण्यात आली. जिल्हाधिकारी पाटील यांनी ही मागणी राज्य शासनाकडे पाठवण्याचे आश्वासन दिले. याबाबत ज्ञानविकास मंडळाचे कार्यवाह प्रसाद चाफेकर म्हणाले की, लोकप्रतिनिधींनी ज्येष्ठांच्या भावना लक्षात घेऊन तातडीने डॉल्बीबंदीचा निर्णय घ्यावा, अन्यथा १५ ऑगस्टला सातारा शहरात रॅली काढून निषेध नोंदवला जाईल.

## नोकरीसाठी कागदोपत्री घटस्फोट उमेदवारांची सखोल चौकशी सुरू

■ जयपूर

**राजस्थानातील** सरकारी नोकरीमधील घटस्फोटित महिलांसाठी असलेल्या दोन टक्के आरक्षणाच्या कोट्याचा लाभ उचलण्यासाठी केवळ कागदावर घटस्फोट घेतलेल्या उमेदवारांची चौकशी करण्यात येणार आहे.

राजस्थान नोकरभरती आयोगाने म्हटले की, अशा प्रकारे कागदोपत्री घटस्फोट मिळवून नोकरी मिळवल्याच्या विरोधात १२ तक्रारी आलेल्या आहेत. या उमेदवारांची कायदेतज्ज्ञ व पोलिसांच्या मार्फत तपासणी करण्यात येणार आहे. आयोगाने या आरक्षणाद्वारे नोकरी मिळवणाऱ्या सर्व पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी सुरू केली आहे. या तपासणीत याहूनही अधिक प्रकरणे बाहेर येतील. याची कठोर चौकशी केल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

## बालाजी मंदिराचे बांधकाम सीआरझेड नसलेल्या क्षेत्रातच

मंदिर ट्रस्टची ग्वाही

■ उरण

**नवी** मुंबईतील उलवे येथे किनाऱ्यावर उभारण्यात येणारे बालाजी मंदिर सीआरझेड हद्दीच्या आतील क्षेत्रापुरतेच मर्यादित राहील, अशी ग्वाही तिरुमला तिरुपती देवस्थान (टीटीडी) ट्रस्टने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) पश्चिम विभागीय खंडपीठासमोर दिली. पर्यावरण मंचाने व्यक्त केलेल्या शंकांवर उत्तर देताना तिरुमला तिरुपती देवस्थानने सीआरझेड क्षेत्रात कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी पूर्वपरवानगी घेण्याचेही वचन दिले.

एप्रिल २०२२ मध्ये सिडकोने उलवे किनाऱ्यावर मंदिरासाठी ४०,००० चौरस मीटर भूखंड दिला होता. मात्र, या भूखंडाचा काही भाग सीआरझेड नियमांत येत असल्याचा आरोप करत नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी याचिका दाखल केली होती. अण्णा विद्यापीठाच्या रिमोट सेन्सिंग संस्थेच्या सर्वेक्षणात सुरुवातीला भूखंडाचा मोठा भाग सीआरझेड-१ए आणि सीआरझेड-२मध्ये असल्याचे दिसून आले होते. महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने ५० मीटर खारफुटी बफर झोनमध्ये कंपाऊंड वॉल आणि बागकामास परवानगी दिली होती, ज्याला याचिकाकर्त्यांनी विरोध केला होता.

## पिंगुळीत यंदा एकच दहीहंडी

■ सिंधुदुर्ग

**कुडाळ** तालुक्यातील पिंगुळी गावात यंदा केवळ एकच मानाची दहीहंडी साजरी करण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला आहे. सरपंच अजय आकेरकर यांच्या पुढाकाराने झालेल्या बैठकीत सर्व मंडळांचे प्रतिनिधी आणि गावातील मान्यवर सहभागी झाले.

गेल्या तीन वर्षांपासून गावात एकच दहीहंडी साजरी होत होती. मात्र मागील वर्षी काही मंडळांनी स्वतंत्रपणे उत्सव साजरा केला होता. यंदा मात्र सर्व गैरसमज दूर करून, सर्व मंडळांनी एकत्रितपणे एकच मोठी व मानाची दहीहंडी आयोजित करण्याचे ठरवले आहे. आयोजकांनी सर्व ग्रामस्थांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवात सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

## अमेरिकेत हरियाणाच्या तरुणाचा अपघातात मृत्यू

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेतील** कॅलिफोर्नियात झालेल्या रस्ते अपघातात हरियाणातील कर्नाल जिल्ह्यातील मंचुरी गावचा तरुण गुरुमहाक सिद्धू (२६) याचा मृत्यू झाला. तो वॉशिंग्टनहून कॅलिफोर्नियाला ट्रॉलीत सामान घेऊन येत होता. त्यादरम्यान ट्रॉलीचा तोल गेला आणि ती खड्ड्यात पडली. त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.

गुरुमहाक हा मंचुरी गावचे माजी सरपंच सरदार हिरा सिंग यांचा एकुलता एक मुलगा आहे. तो तीन वर्षांपूर्वी छुप्या मार्गाने अमेरिकेत गेला होता. सुरुवातीला दुकानात काम केल्यानंतर, वर्षभरापूर्वी ड्रायव्हिंग लायसन्स मिळाल्यावर तो ट्रॉली चालक म्हणून काम करू लागला. त्याची बहीण लग्नानंतर कॅनडात स्थायिक झाली असून, पालक कुरुक्षेत्रात राहतात. मुलाला अमेरिकेत पाठवण्यासाठी हिरा सिंग यांनी सुमारे ३५ लाख रुपये नातेवाईकांकडून कर्ज घेऊन खर्च केले होते. सध्या त्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक असून, मुलाचा मृतदेह भारतात आणण्यासाठी त्यांनी सरकार आणि प्रशासनाकडे मदतीची विनंती केली आहे.

## एअर इंडियाच्या वैमानिकांची निवृत्ती आता ६५ व्या वर्षी

■ नवी दिल्ली

**टाटा** समूहाच्या मालकीच्या एअर इंडिया कंपनीने वैमानिकांच्या निवृत्तीचे वय ५८ वरून वाढवून ६५ वर्षे केले आहे. कंपनीत सुमारे २४ हजार कर्मचारी आहेत. त्यात ३,६०० वैमानिक आणि ९,५०० केबिन क्रू सदस्यांचा समावेश आहे. केबिन क्रूच्या निवृत्ती वयाबाबत अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. मात्र तेही ६५ वर्षे करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती आहे. यापूर्वी टाटाच्याच विस्तारा एअरलाईनमध्ये वैमानिकांचे निवृत्ती वय ६५ होते.

## ऐतिहासिक विजयदुर्ग किल्ल्याच्या व्यंकट बुरुजाचा भाग कोसळला

■ सिंधुदुर्ग

**ऐतिहासिक** वारसा स्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवगड तालुक्यातील विजयदुर्ग किल्ल्याला पुन्हा एकदा नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला आहे. या किल्ल्याचा व्यंकट बुरुजाचा खालचा भाग हा कोसळला आहे. पावसाळ्यात समुद्राच्या उधाणामुळे लाटा आदळून किल्ल्याची मोठ्या प्रमाणात पडझड होत आहे.

मासेमारीसाठी समुद्रात गेलेल्या स्थानिक मच्छीमारांना हा प्रकार दिसल्यानंतर त्यांनी तत्काळ किल्ल्याच्या कर्मचाऱ्यांना माहिती दिली. प्राथमिक पाहणीनुसार, बुरुजाच्या पायाकडील सुमारे दोन मीटर उंच आणि पंधरा फूट रुंद भाग पूर्णपणे कोसळला आहे.

विजयदुर्ग किल्ला खडकावर टप्प्याटप्प्याने बांधण्यात आला असून, त्याला तीन बाजूंनी खोल पायाचे आणि नैसर्गिक खडकांचे संरक्षण आहे. बांधणीच्या वेळी समुद्रातील खडकांची अशी मांडणी करण्यात आली आहे की, लाटांची ऊर्जा कमी होऊन ती परत समुद्रात जाईल. मात्र, कालांतराने ही नैसर्गिक रचना कमकुवत झाली असून, लाटांचा मारा वाढला आहे. आता हा किल्ला युनेस्कोच्या ताब्यात असल्याने तटबंदी दुरुस्तीचे काम लवकरात लवकर होईल, अशी आशा किल्लाप्रेमी व्यक्त करत आहेत.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# मतदार महत्त्वाचा की राजकीय पक्ष?

आणखी दोन दिवसांनी स्वातंत्र्य दिन साजरा होईल. स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व अनन्यसाधारण असते. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले परंतु त्याबरोबरच भारताने स्वतःचा प्रजासत्ताक देश म्हणूनही गौरव करून घेतला. आज जगात सर्वात मोठे लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून नावलौकिक मिळवलेला भारत देश आहे. विशेष म्हणजे जगात भारत हा एकमेव देश आहे की जिथे आचार-विचार स्वातंत्र्याचे विशेष संवर्धन होते. प्रत्येकाला आपापले विचार मांडण्यापासून ते आपले धर्म उपासना करण्याची पूर्णपणे मोकळीक दिली गेलेली आहे. स्वातंत्र्याचा भरपूर उपभोग भारतामध्ये प्रत्येक नागरिकाला घेता येतो. मात्र याबरोबरच भारताने संसदीय लोकशाही व्यवस्था स्वीकारलेली आहे. गेल्या ७०-७५ वर्षांचा अनुभव लक्षात घेतल्यानंतर या लोकशाहीचा उपयोग लोकांसाठी किती प्रमाणात होतो आणि राजकीय पक्ष कसा गैरफायदा घेतात यावर बरेच काही मंथन होऊन गेलेले आहे. किंबहुना प्रत्येक वर्षी नवा नवा अनुभव येत असतो आणि राजकीय पक्ष या लोकशाही व्यवस्थेतल्या सर्व प्रकारच्या स्वैराचाराचा यथेच्छ उपभोग घेतात. मग अगदी बोगस राजकीय पक्ष स्थापन करण्यापासून ते मतदारांना गौण समजण्यापर्यंत अनेक प्रकार पाहायला मिळतात. म्हणून आता स्वातंत्र्य दिन साजरा करत असताना किंवा संसदीय लोकशाहीची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर या व्यवस्थेमध्ये मतदार महत्त्वाचा आहे की, राजकीय पक्ष महत्त्वाचे आहेत असा मूलभूत प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. गेल्या काही वर्षांपासून राजकीय पक्षांनी स्वतःचे महत्त्व इतके वाढवले आहे की, त्यांच्याशिवाय लोकशाही जिवंत राहू शकत नाही असा त्यांनी पुरेपूर समज करून घेतला आहे आणि लोकांच्या मनावरही तो बिंबवलेला आहे. म्हणजे भारतात लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर राजकीय पक्षांशिवाय पर्याय नाही अशी त्यांनी पूर्णपणे धारणा केलेली आहे. ती लोकांच्याही मनावर बिंबवलेली आहे. त्याचा परिणाम असा होतो की, जी लोकशाही टिकवण्याची खऱ्या अर्थाने जबाबदारी किंवा कर्तव्य मतदारांकडून पार पाडले जाते. प्रत्येक मतदाराने केलेले मतदान हे अमूल्य स्वरूपाचे असते आणि या मतदानाच्या जोरावरच कोणी सत्ता करायची किंवा राज्यकारभार कोणी बघायचा याचा निर्णय होत असतो. म्हणजेच लोकशाही व्यवस्थेचा मूलभूत घटक किंवा प्रमुख हा मतदार असला पाहिजे. दुर्दैवाने या मतदाराकडे दुर्लक्ष होते आणि एकदा निवडून गेल्यानंतर पाच वर्षे या मतदाराच्या बाबतीत कोणीही फारशी काळजी घेताना दिसत नाही किंवा त्याच्याविषयीची जबाबदारी पार पाडताना दिसत नाही.

### मतदाराचे हित महत्त्वाचे

गेल्या काही दिवसांमध्ये मतदार याद्यांच्या गोंधळाबाबत राजकीय पक्षांकडून जे काही वातावरण निर्माण केले जाते आहे त्यातूनच पुन्हा एकदा मतदार महत्त्वाचा की राजकीय पक्ष महत्त्वाचे असा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. राजकीय पक्षांना निवडणुका जिंकायच्या असल्यामुळे मतदारांची संख्या वाढणे हे त्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते. पण ही मतदारांची संख्या कशा पद्धतीने वाढते आहे ते कोणत्या पद्धतीने वाढवतात, त्यात काय गैरप्रकार होतात याचा कोणीही फारसा विचार करत नाही. निवडणूक आयोग या सगळ्या व्यवस्थेत एक प्रमुख स्वायत्तयंत्रणा आहे. कोणत्याही परिस्थितीत निवडणुकीमध्ये गैरप्रकार होऊ नये अशी काळजी त्यांच्याकडून घेतली जाते. विशेषतः देशाची एकूण लोकसंख्या जर १५० कोटी असेल तर त्यापैकी निदान ९०% तरी लोकांनी मतदान केले पाहिजे. आज जवळपास १०० कोटी लोक मतदार आहेत आणि या मतदारांपैकी किमान ९० कोटी लोकांनी तरी मतदान केले पाहिजे, असा प्रयत्न निवडणूक आयोगाकडून होत असतो. वाढलेले मतदार हे कशा पद्धतीने मतदान करतात किंवा मतदार वाढले म्हणजे मतदानामध्ये गोंधळ झाला अशा प्रकारची समजूतही राजकीय पक्षांकडून करून दिली जाते आहे. यामधली नेमकी वस्तूस्थिती काय आहे हे अतिशय स्पष्ट शब्दांत सांगण्याचे काम निवडणूक आयोगाने केले पाहिजे. वस्तुस्थिती लोकांसमोर आणली पाहिजे हा मतदार याद्यांमधला घोळ आहे की राजकीय प्याद्यांनी घातलेला गोंधळ आहे हे चित्र आज निर्माण झाले आहे. त्यातला फरक नेमका काय आहे हे लोकांपुढे आणण्याची जबाबदारी खरेतर निवडणूक आयोगाकडेच येते.

### निवडणूक आयोगाचे कर्तव्य

लोकशाही व्यवस्थेमध्ये जर मतदार सर्वात महत्त्वाचा घटक असेल तर त्या मतदाराचे हित जपणे हे सुद्धा निवडणूक आयोगाचे कर्तव्य ठरते. कोणत्याही परिस्थितीत राजकीय पक्षांना मतदाराला गृहीत धरता येणार नाही किंवा मतदारांची संख्या वाढते आहे. म्हणजे मग आपल्या बाजूने मतदान होणार नाही किंवा आपल्या विरोधी मतदान होईल अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याची संधी कोणाला मिळणार नाही. चुकीच्या पद्धतीने मतदारांची नोंदणी करून आपले राजकीय हित साधून घेण्याची संधी राजकीय पक्षांना मिळता कामा नये. यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजना निवडणूक आयोगाकडूनच होऊ शकतात. यासंदर्भात निवडणूक आयोगावर मोठी जबाबदारी येऊन पडते आणि सध्याच्या वातावरणामध्ये ज्या प्रकारचा संभ्रम निर्माण केला जातो आहे त्यावरून मतदार महत्त्वाचा की राजकीय पक्ष महत्त्वाचे यावरही राष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा विचार मंथन व्हायला हवे आणि विशेषतः मतदारांनी किंवा सर्वसामान्य जनतेने राजकीय पक्षांचा विचार न करता आपण मतदार आहोत. आपल्याला मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे आणि त्यासाठी स्वतःहून मतदार नोंदणी करून घेणे. निवडणूक काळामध्ये आपला हा लोकशाहीने दिलेला सर्वात प्रमुख हक्क तितक्याच जबाबदारी बजावणे हीसुद्धा नैतिक जबाबदारी येऊन पडते. त्यातच मतदारांचे हितही सामावलेले आहे जे लोकशाहीच्या संवर्धनासाठी खूप महत्त्वाचे असते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**तुमच्याकडे समाधान असेल तर तुम्ही श्रीमंत आहात. शांती असेल तर सुखी आहात आणि दया असेल तर एक चांगली व्यक्ती आहात.**

## पंचांग

**मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण तृतीया**
**नक्षत्र : पूर्वा भाद्रपदा**

**रवी उदय- ०६-२०**
**रवी अस्त- १९-०७**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०६-१० कुंभ**
**०६-११ ते २४-०० मीन**

**अंगारकी संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री ९.१८; मंगळागौरी व्रत; बाबा महाराज पुण्यतिथी - पुणे**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### वरी तांदूळ पुलाव



★ **साहित्य :-** १ कप वरी तांदूळ, २ टिस्पून तूप, १/२ टिस्पून जिरे, २ हिरव्या मिरच्या, १/२ कप भोपळ्याचे मध्यम तुकडे (साल काढून टाकावे), १/२ कप बटाट्याचे तुकडे (बटाटा सोलून), २ टिस्पून शेंगदाण्याचा कूट, चवीपुरते मीठ, साधारण ३ कप उकळते पाणी

★ **कृती :-**
१) जाड बुडाच्या पातेल्यात वरी तांदूळ थोडे भाजून घ्यावे, म्हणजे भात हलका होतो. तांदूळ एका भांड्यात तात्पुरता काढून ठेवावेत. २) त्याच पातेल्यात तूप गरम करून त्यात जिरे आणि मिरच्या घालून परतावे. गॅस मध्यम ठेवावा. बटाट्याच्या फोडी घालून एक वाफ काढावी. बटाटा जवळजवळ शिजला की, त्यात वरी तांदूळ घालावेत. ३) मिक्स करून त्यात गरम पाणी घालावे. मीठ घालावे. एक दोन मिनिटांनी भोपळ्याच्या पातळ फोडी आणि दाण्याचा कूट घालावा. मध्यम आचेवर वाफ काढावी. गरमागरम वरीचा पुलाव दाण्याच्या आमटीबरोबर किंवा फोडणीच्या ताकाबरोबर सर्व्ह करावा.



# वर्ल्ड कपचा दुष्काळ आम्ही संपवणार
## भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरचा निर्धार

**आयसीसी वर्ल्ड कपचा दुष्काळ भारतीय संघ संपवणार असल्याचा निर्धार भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने व्यक्त केला. आज लोअर परेलमधील एका हॉटेलमध्ये आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले. त्यावेळी ती बोलत होती.**



■ मुंबई

त्यावेळी आयसीसीचे अध्यक्ष जय शहा आणि माजी भारतीय कर्णधार मिताली राज, माजी क्रिकेटपटू युवराज सिंग,भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, उपकर्णधार स्मृती मंधाना आणि फलंदाज जेमिमा रॉड्रिग्ज आणि आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली, भारतीय महिला क्रिकेट टीमने आतापर्यंत कोणताही आयसीसी वर्ल्ड कप जिंकलेला नाही. मात्र यावेळी आम्ही नक्कीच चांगली कामगिरी करु आणि क्रिकेट वर्ल्ड कप जिंकण्याचा प्रयत्न करु.२०१७ साली इंग्लंडमध्ये झालेल्या वनडे वर्ल्ड कप स्पर्धेत भारताने चांगली कामगिरी केली. अंतिम फेरीत धडक मारली. मात्र विश्वविजेता होता आले नाही. भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. त्यामुळे यावर्षीचा वर्ल्ड कप जिंकण्याचा आमचा प्रयत्न आहे. विश्वचषक आमच्यासाठी नेहमीच खास राहिलेला आहे. मी नेहमी माझ्या देशासाठी काहीतरी खास करायची इच्छा आहे. मी जेव्हा कधी युवराज सिंगला बघते तेव्हा मला खूप काही प्रेरणा मिळते.

क्रिकेटपटू युवराज सिंग म्हणाला की, अनेक वर्षानंतर भारतात क्रिकेट वर्ल्ड कप होत आहे. त्यामुळे मी खूप उत्साही आहे. भारतात क्रिकेटला धर्म मानले जाते. त्यामुळे आम्हाला सगळ्यानांच देशात वर्ल्ड कप होत असल्यामुळे भारतीय महिला क्रिकेट टीमकडून मोठ्या अपेक्षा आहेत आणि नक्कीच भारतीय टीम चांगली कामगिरी करेल. माजी कर्णधार मिताली राज म्हणाली की, भारतात क्रिकेट वर्ल्ड कप होत असल्यामुळे खूप आनंद होत असून मी खूप उत्साही आहे. नक्कीच आपली टीम चांगली कामगिरी करेल.

# ऑक्टोबरमध्ये भारतात प्रथमच तिरंदाजी लीग स्पर्धा होणार

■ नवी दिल्ली

भारतात पहिल्यांदाच तिरंदाजी लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा अखिल भारतीय तिरंदाजी संघटनेने केली. ही स्पर्धा ऑक्टोबर महिन्यात दिल्लीत भरविली जाणार आहे. दिल्लीतील यमुना क्रीडा संकुलामध्ये ही स्पर्धा ११ दिवस चालणार आहे. विश्व तिरंदाजी संघटना, आशियाई तिरंदाजी संघटना आणि क्रीडा मंत्रालयाच्या प्रोत्साहनामुळे या स्पर्धा पहिल्यांदाच भारतामध्ये भरविली जात आहे. भारतीय तिरंदाजांचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टिने ही योजना आखण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये जगातील अव्वल १० तिरंदाज सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमध्ये सहा फ्रांचायझींचे संघ राहतील. या स्पर्धेमुळे भारतीय तिरंदाजपटूंना सराव मिळेल आणि त्याचा लाभ त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये होऊ शकेल, असे अखिल भारतीय तिरंदाजी संघटनेचे अध्यक्ष अर्जुन मुंडा यांनी सांगितले.

# हॉकी इंडिया ज्युनियर पुरुष स्पर्धेत ३० संघ सहभागी होणार

■ नवी दिल्ली

हॉकी इंडिया ज्युनियर पुरुष राष्ट्रीय स्पर्धेत ३० संघ सहभागी होणार आहे. या संघांना 'अ', 'ब' आणि 'क' गटामध्ये विभागण्यात आले. 'अ' मध्ये देशातील १२ सर्वोत्तम ज्युनियर पुरुष संघांचा समावेश आहे. यामध्ये गतविजेता पंजाब, उपविजेता उत्तर प्रदेश आणि तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या हरियाणा यांचा समावेश आहे. या गटातील सामने १६ ऑगस्ट रोजी सुरू होतील. त्यानंतर २० ते २३ ऑगस्ट दरम्यान क्वार्टर फायनल, सेमीफायनल आणि फायनल होतील. ब गटामध्ये फक्त लीग सामने असतील, ज्यामध्ये अव्वल दोन संघ पुढील वर्षी विभाग अ गटामध्ये खेळतील तर शेवटचे दोन संघ क गटामध्ये खाली खेचले जातील. 'क' गटाचे सामने देखील लीग फॉरमॅटमध्ये खेळवले जातील. ज्यामध्ये संघांना प्रत्येकी चार संघांच्या दोनमध्ये विभागले जाईल. अव्वल दोन संघ पुढील वर्षी 'ब' गटाचा भाग असतील. हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की म्हणाले,

# अर्शद नदीम, नीरज चोप्राचा सिलेसिया लीगमध्ये समावेश नाही

■ सिलेसिया



पॅरिस ऑलिम्पिक सुवर्ण आणि रौप्यपदक विजेते अर्शद नदीम आणि नीरज चोप्रा यांची सिलेसिया डायमंड लीगमध्ये अपेक्षित लढत होणार नाही. कारण या दोघांचेही प्रवेश यादीत नाव नसल्याचे स्पष्ट झाले आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नदीमने ९२.९७ मीटरच्या भालफेकसह सुवर्ण आणि नीरजने ८९.४५ मीटरची सर्वोत्तम कामगिरी करत रौप्यपदक जिंकले होते. मे महिन्यात दोहा डायमंड लीग स्पर्धेत नीरजनेही ९०मीटरचा टप्पा गाठला.जुलै महिन्यात बंगळुरू येथे नीरज चोप्रा क्लासिकमध्ये भाग घेण्यासाठी नदीम भारतात येण्याची अपेक्षा होती.मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमधील सीमा तणावामुळे या कल्पनेवर जनतेची तीव्र टीका झाली आणि अखेर पाकिस्तानी थ्रोअरला आमंत्रित करण्यात आले नाही.सिलेसिया डायमंड लीगमधून दोन्ही नावे वगळण्यात आल्यामुळे सप्टेंबरमध्ये टोकियोमध्ये होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत त्यांची गाठ पडण्याची शक्यता आहे. नीरज हा भालाफेकचा जागतिक विजेता आहे.त्याने २०२३मध्ये ८८.१७ मीटरच्या भालफेकसह त्यावेळी जेतेपद पटकावले होते.

# वेस्ट इंडिज संघाचा पाकिस्तानवर विजय

■ त्रिनिदाद

दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजने पाकिस्तानचा ५ विकेटने पराभव केला. यासह ३ सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत आली. त्रिनिदादमधील ब्रायन लारा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पावसामुळे व्यत्यय आलेल्या या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.पावसामुळे सामना ३७-३७ षटकांचा करण्यात आला.पाकिस्तानने ३७ षटकांत ७ गडी गमावून १७१ धावा केल्या. वेस्ट इंडिजला डीएलएस नियमानुसार ३५ षटकांत १८१ धावांचे लक्ष्य मिळाले.

# आशियाई सर्फिंग स्पर्धेत रमेश बुधिहाळला कांस्य

■ चेन्नई

आशियाई सर्फिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताच्या रमेश बुधिहाळने पुरुष गटात कांस्यपदक मिळविले. या क्रीडा प्रकारात भारताला पदक मिळवून देणारा रमेश बुधिहाळ हा पहिला स्पर्धक आहे.पुरुषांच्या खुल्या गटातील सर्फिंग प्रकारात रमेशने १२.६० गुण नोंदवित तिसऱ्या स्थानासह कांस्यपदक पटकाविले.या क्रीडा प्रकारात कोरियाच्या कॅनोआ हिजेने १५.१७ गुण घेत सुवर्ण आणि इंडोनेशियाच्या पेजर अरियानाने १४.५७ गुण घेऊन रौप्यपदक पटकाविले. महिलांच्या खुल्या गटामध्ये जपानच्या अनेरी मात्सूनोने १४.९० गुणांसह सुवर्ण, जपानच्या सुमोमो सॅटोने १३.७० गुणांसह रौप्य आणि थायलंडच्या इसाबेल हिग्जने ११.७६ गुणांसह कांस्यपदक मिळविले. मुलांच्या १८वर्षांखालील वयोगटात कोरियाच्या हिजेने १४.३३ गुणांसह सुवर्ण आणि चीनच्या वूने १३.१० गुणांसह रौप्य आणि चीनच्या जीयांगने कास्यपदक घेतले.मुलींच्या १८वर्षांखालील गटात चीनच्या सिक्की यांगने १४.५० गुणांसह सुवर्ण आणि चीनच्या जीनने १०.३३ गुणांसह रौप्य आणि थायलंडच्या ईसाबेलने ८.१० गुणांसह कांस्यपदक मिळविले.

# राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत प्रशांत आणि केशर विजयी

■ मुंबई



सोमेश्वर फाऊंडेशनच्या वतीने व सनी निम्हण यांच्या पुढाकाराने पुण्यातील गोविंदा गार्डन मंगल कार्यालयात आयोजित केलेल्या विनायक निम्हण स्मृती दुसऱ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटात माजी विश्वविजेत्या मुंबईच्या प्रशांत मोरेने बाजी मारली.अंतिम फेरीत त्याने मुंबईच्या विकास धारियावर सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व ठेवले आणि २४-१०, २५-० असा सहज फडशा पडला. अंतिम फेरीत प्रवेश करण्यापूर्वी प्रशांत मोरेने रियाझ अकबर अलीवर १८-१२, २५-१ असा तर विकास धारियाने झैद अहमदवर ८-२५, १४-१२ व २१-१० असा विजय मिळवला होता.तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत ठाण्याच्या झैद अहमदने माजी आंतर राष्ट्रीय विजेत्या रत्नागिरीच्या रियाझ अकबर अलीवर २४-११, २३-२० अशी मात केली. तर महिला एकेरी गटात सिंधुदुर्गच्या केशर निर्गुणने अंतिम विजय मिळवताना प्रतिस्पर्धी ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरला २२-१७,२४-१४ असे सरळ दोन सेटमध्ये हरवून विजय संपादन केला.अंतिम फेरीत मजल मारणाऱ्या केशरने उपांत्य फेरीत मुंबईच्या सोनाली कुमारीवर २३-१६, २५-० अशी तर समृद्धीने मुंबईच्या प्राजक्ता नारायणकरवर २५-१७, १९-१८ अशी मात केली होती. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबईच्या सोनाली कुमारीवर ०-२५, २२-१७ व २०-१५ असा विजय संपादन केला.

### शहाजहाँची सर्वात प्रिय आणि आवडती
# बेगम मुमताज महल

**मुमताज महल यांचे खरे नाव अर्जुमंद बानो. त्यांचे वडिल अब्दुल हसन आसफ खां, ते मोगल साम्राज्यातील चैथे शासक आणि शहाजहाँचे वडिल जहांगिर यांचे वजिर म्हणुन कार्यरत होते. तसच मुमताज महलची आत्या 'नुरजहाँ' ही मोगल सम्राट जहांगिर यांची सर्वात प्रिय बेगम होती. मुमताज महल अतिशय सुंदर आणि गुणवान स्त्री होती. ती हरम जवळ असलेल्या मीना बाजारात काचेचे आणि रेशमाचे मोती विकण्याचे काम करायची. १६०७ मध्ये तिची भेट याच बाजारात मोगल वंशाचा शहजादा शहाजहाँशी (खुर्रम) झाली. त्या सुमारास ती केवळ १४ वर्षांची होती.**



अगदी तेव्हांपासुन शहाजहाँ आणि मुमताज महल यांच्या ऐतिहासिक प्रेमकथेला सुरूवात झाली. हळुहळु त्यांच्या प्रेमाचं नातं अधिकाधिक घट्ट होत गेलं आणि पाच वर्षानंतर मुमताज महल आणि मोगल वंशाचा शहजादा शहाजहाँ यांनी



१६१२ ला निकाह केला. निकाह पश्चात ती शहाजहाँ ची सर्वात प्रिय आणि आवडती बेगम झाली. तिच्याशिवाय शहाजहाँ एक क्षण देखील राहु शकत नव्हता.

अर्जुमंद बानोच्या अलौकिक सौंदर्याने शहाजहाँ एवढा प्रभावित होता की त्याने निकाहानंतर तिचे नाव बदलुन 'मुमताज महल' असे केले. याशिवाय त्याने मुमताज महलला 'मलिका-ए-जमानी' ही उपाधी देखील प्रदान केली होती. शहाजहाँ च्या मुमताज महल व्यतिरीक्त अनेक बेगम होत्या परंतु त्याच्या राज्यात जो सन्मान आणि मान मुमताज महल ला मिळाला तसा अन्य कुणालाही देखील प्राप्त झाला नाही.

इतिहासकारांच्या मते मोगल सम्राट शहाजहाँ ने मुमताज महलला आपल्या राज्यकारभाराशी संबंधीत अनेक महत्वपुर्ण निर्णय घेण्याचा अधिकार देखील बहाल केला होता. इतकेच नव्हें तर मुमताज महलच्या समंतीशिवाय मोगल सम्राट शहांजहाँ कोणतेही फरमान जारी करत नसे.

शहाजहाँ आणि मुमताज महलचे उत्कट प्रेम पाहाता असे देखील म्हंटले गेले आहे की शहांजहाँला आपल्या बेगम प्रती इतकी ओढ आणि प्रेम होते की तो तिच्याशिवाय एक क्षण देखील राहु शकत नव्हतां आणि म्हणुन आपल्या राज्यकारभाराशी संबंधीत दौरयांमध्ये सुध्दा तो तिला आपल्या सोबत नेत असे.

तसेच आपली सर्वात विश्वासपात्र जोडीदार म्हणुन शहांजहाँने मुमताज महलचा गौरव करीत तिच्या सन्मानार्थ आगरा येथे विशेष महल, मुहर उजाह, शाही मुहर सारख्या भव्यदिव्य महलांची निर्मीती केली होती. शहाजहाँने अनेक कवीना मुमताज च्या सौंदर्यावर अनेक काव्य लिहीण्याकरता प्रेरित केले होते.

मुमताज महल ने एकुण १४ अपत्यांना जन्म दिला. ज्यात ८ मुलं आणि ६ मुली होत्या. परंतु त्यांची ७ अपत्येच जिवीत राहु शकली. त्यांच्या इतर मुलांचा मृत्यु किशोरावस्थेतच झाला. त्यांच्या अपत्यांमध्ये जहाँआरा बेगम, दाराशिकोह यांचा समावेश आहे.

दाराशिकोह त्यांचा सर्वात सभ्य, समंजस, आणि बुध्दीमान पुत्र होता. यालाच आपल्या मृत्युपश्चात आपला उत्तराधिकारी बनविण्याची शहांजहाँची इच्छा होती. पण पुढे त्याला आपल्या लोभी भाऊ औरंगजेबासमोर पराजय पत्करावा लागला. मुमताज महल ला आपल्या १४ व्या अपत्याला 'गौहर बेगम' जन्म देतांना प्रचंड प्रसव पिडेला सामोरे जावे लागले आणि त्यातच १७ जुन १६३१ ला तिचा निधन झाले.

आपल्या अत्यंत प्रिय बेगमच्या मृत्यु पश्चात शहांजहाँ शोकसागरात बुडाला होता. असे देखील म्हंटले जाते की मुमताज बेगमच्या मृत्युनंतर तब्बल दोन वर्ष शहांजहाँ शोकमग्न होता. या दरम्यान आपल्या रंगीन आवडी निवडींकरता प्रसिध्द असलेल्या शहांजहाँने आपल्या आवडी निवडी बाजुला सारल्या होत्या या काळात त्याने कोणतेही शाही लिबास परिधान केले नाहीत आणि कोणत्याही शाही कार्यक्रमात उपस्थित देखील राहिला नाही.

मुमताज महलच्या मृत्यु नंतर शहांजहाँने आपल्या प्रेमाचे अमर प्रतिक म्हणुन तिच्या स्मरणार्थ आगरा येथे 'ताजमहल' ची निर्मीती केली. ताजमहल आपल्या भव्यदिव्यतेमुळे आणि आकर्शक कलाकृतीमुळे जगातील सात आश्चर्यपैकी एक गणला जातो. याच्या निर्मीतीकरता तब्बल २३ वर्षांचा कालावधी लागला. 'ताजमहल' भारतीय आणि विदेशी पर्यटकांचे हे मुख्य आकर्षणाचे केंद्र आहे.

'ताजमहल' हा मुमताज महल ची अत्यंत भव्य आणि आकर्शक कब्र आहे. त्यामुळे या इमारतीला ''मुमताज का मकबरा'' देखील म्हंटल्या जातं. या शिवाय 'ताजमहल' शहांजहाँ आणि मुमताज महल यांच्या अव्दितीय प्रेमाचे प्रतिक म्हणुन देखील प्रसिध्द आहे.



# काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रतिभा शिंदेंचा राजीनामा

■ जळगाव



**काँग्रेसकडून** दुसऱ्यांदा प्रदेश उपाध्यक्षपदाची संधी मिळालेल्या प्रतिभा शिंदे यांनी पक्षाची साथ सोडत आज तडकाफडकी राजीनामा दिला. त्यांच्या या निर्णयामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. त्या रविवारी, १७ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या उपस्थितीत जळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत.

तापी-नर्मदा खोऱ्यात तसेच सातपुडा पर्वतरांगांमध्ये वास्तव्यास असलेल्या आदिवासी, दलित, बहुजन आणि अल्पसंख्याकांच्या न्यायहक्कांसाठी गेली २५ वर्षे लोकसंघर्ष मोर्चाच्या माध्यमातून लढा देत असलेल्या शिंदे यांनी नंदुरबार ते मुंबई अशी सुमारे ५०० किलोमीटर पदयात्रा काढून विधान भवनावर धडक दिली होती. त्यावेळी त्यांनी सरकारला चांगलेच कोंडीत पकडले होते. पक्षाला असलेली त्यांची गरज लक्षात घेऊन, नुकत्याच जाहीर झालेल्या प्रदेश कार्यकारिणीत त्यांची दुसऱ्यांदा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. मात्र नियुक्ती होऊन आठ दिवस उलटण्याआधीच त्यांनी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांकडे राजीनामा पाठवला. त्यांच्या पत्रात राजीनाम्याचे नेमके कारण नमूद केलेले नाही.

# पाथरीत कावड यात्रेत गाडी घुसली! दोन ठार

■ परभणी

**पाथरी-सेलू** मार्गावर खेडूळा पाटीजवळ आज पहाटे कावड यात्रेत गाडी घुसून झालेल्या अपघातात दोन भाविकांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. ऋषिकेश अशोक शिंदे आणि एकनाथ गजमल अशी मृतांची नावे आहेत. अखंड हिंदू राष्ट्र समितीच्यावतीने आज सकाळी सेलू रेल्वे गेटपासून कावड यात्रेला सुरुवात होणार होती. यात्रेसाठी शहरात मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली होती. विविध भागात फलक-बॅनर लावून वातावरण निर्मिती झाली होती. शेकडो तरुण सहभागी असलेली ही यात्रा शंकर लिंग मंदिर व सुरज मोड येथे मिरवणुकीनंतर समाप्त होणार होती. मात्र, कावड यात्रा सेलूत पोहोचण्यापूर्वी पाथरीतील अपघातात दोन भाविकांचा मृत्यू झाला.



**भोईवाडा पोलीस मैदानावर एका झाडावर दोन पोपट दिसून आले.**

# जेएनपीटी शाळेतील कर्मचाऱ्यांचे अन्यायाविरोधात आमरण उपोषण

■ उरण

**जवाहरलाल** नेहरू पोर्ट विद्यालयातील (जेएनपीटी) शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहनशीलतेचा बांध आज अखेर फुटला आहे. सात वर्षांचा आर्थिक छळ, मानसिक त्रास आणि प्रशासनाची डोळेझाक याविरोधात आजपासून कर्मचाऱ्यांनी शाळेच्या गेटसमोरच आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या रुस्तमजी केरावाला फाऊंडेशन संस्थेने सातवा वेतन आयोग लागू केला नाही. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात येणारी वार्षिक वेतनवाढ व महागाई भत्ता जुलै २०१९ पासून थांबवण्यात आला आहे. सात वर्षांची थकीत रक्कम अद्याप न मिळाल्याने कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. शासकीय नियमांनुसार शाळेचे हस्तांतरण होऊन तीन वर्षांचा कालावधी संपला, तरी कर्मचाऱ्यांच्या मागण्या केवळ फाईलपुरत्या राहिल्या आहेत.

# पालिका निवडणुकीसाठी उबाठा युवासेनेकडून निरीक्षक जाहीर

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, उबाठाने काही दिवसांपूर्वी विधानसभा क्षेत्रांसाठी निरीक्षक नेमले होते. आता उबाठाच्या युवासेनेनेही तयारीला सुरुवात केली आहे. मुंबईतील विधानसभा मतदारसंघांमध्ये युवासेनेकडून निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.


दहिसरमध्ये संदीप वरखडे, सतीश नरसिंग, मागाठाणेत हेमंत दूधवडकर, इमरान शेख, चारकोपमध्ये मयूर कांबळे, संतोष धोत्रे, अनुशक्ती नगरमध्ये मुकेश कोळी, पोपट बेदरकर, शिवडीत गीतेश राऊत, विश्वास पाटेकर, दिंडोशीत प्रथमेश सकपाळ, जसप्रीत सिंग वडेरा, अंधेरी पूर्वमध्ये संकेत सावंत, निलेश गवळी, वांद्रे पूर्वमध्ये बाळा लोकरे, दुर्गेश वैद्य, विक्रोळीत अजिंक्य धात्रक, रितेश सावंत, तर चांदिवलीत अजित गावडे, आदित्य महाडिक यांची नेमणूक करण्यात आली.

# यूपीएससीची संधी हुकली अधिकाऱ्याची आत्महत्या

■ लातूर

**केंद्रिय** लोकसेवा आयोग (यूपीएससी) परीक्षेची शेवटची संधी हुकल्यामुळे बालविकास प्रकल्प अधिकारी रामदास श्रीरामे (३६) यांनी लातूरमधील एका लॉजवर गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी लातूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

रामदास श्रीरामे हे अमरावतीला प्रशिक्षणासाठी जात असल्याचे सांगून घरातून निघाले. मात्र, लातूरमध्येच एका लॉजमध्ये त्यांनी खोली घेतली. दुसऱ्या दिवशी भाडे बाकी असल्याने लॉज कर्मचाऱ्याने दरवाजा ठोठावला. पण प्रतिसाद न मिळाल्याने पोलिसांना बोलावण्यात आले. दरवाजा तोडल्यानंतर त्यांनी गळफास घेतल्याचे उघड झाले. पोलिसांनी खोलीची झडती घेतली असता रामदास यांनी चिठ्ठी मिळाली. या चिठ्ठीत रामदास यांनी म्हटले की, यूपीएससीची शेवटची संधी हुकल्याने मी गळफास घेत आहे. पैशांची समान वाटणी करा. माझ्या मृत्यूची बातमी देऊ नका. अन्यथा स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे तरुण निराश होतील.




**गिरगाव चौपाटीवर बुलडॉग जातीच्या कुत्र्याचा मृतदेह आढळल्यानंतर फॉरेन्सिकची टीम तपासासाठी पोहोचली.**

# फतेहपूरमध्ये हिंदूंकडून प्राचीन मशिदीची तोडफोड

■ लखनौ

**फतेहपूरमध्ये** अबू नगर येथे असलेल्या प्राचीन मकबरा मांगी या मशिदीची भाजपा, बजरंग दल आणि अन्य हिंदू संघटनांच्या कार्यकर्त्यांनी आज तोडफोड केली. ही वास्तु राष्ट्रीय वारसा म्हणून संरक्षित आहे. मात्र या ठिकाणी हजारो वर्षांपूर्वी शिव मंदिर होते. ते पाडून मुस्लीम आक्रमकांनी त्या ठिकाणी मशिद बांधली, असा हिंदू संघटनांचा दावा आहे. केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडे मकबरा मांगी म्हणून नोंद असलेल्या या मशिदीचा मुद्दा मठ मंदिर संरक्षण संघर्ष समितीने उचलून धरला आहे. त्याला भाजपा, बजरंग दल आणि अन्य हिंदू संघटनांनी पाठिंबा दिला आहे. आज सकाळी शेकडोंच्या संख्येने हिंदू संघटनांचे कार्यकर्ते हातात भगवे झेंडे घेऊन मशिदीवर चाल करून आले. जय श्रीराम अशा घोषणा देत त्यांनी मशिदीची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारानंतर वाद आणखी वाढू नये म्हणून स्थानिक जिल्हा प्रशासनाने मशीद परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला.

# संजय कपूरच्या बहिणीची रक्षाबंधन निमित्त भावुक पोस्ट

■ नवी दिल्ली

**सिने** अभिनेत्री करिश्मा कपूरचा पूर्वाश्रमीचा पती आणि उद्योगपती संजय कपूर यांच्या निधनानंतर, त्यांच्या बहीण मंदिरा कपूर हिने रक्षाबंधनानिमित्त आपल्या भावासाठी एक पोस्ट लिहिली आहे. तिने या पोस्टमध्ये स्वतःचा, संजयचा आणि आई राणी कपूर यांचा एक सुंदर फोटो शेअर करून लिहिले की, राखीच्या दिवशी त्यांना आणि त्यांच्या आईला संजयची खूप आठवण आली. मंदिरा कपूरने पोस्टमध्ये लिहिले आहे की, हे लिहायला मला एक दिवस लागला, कारण आजचा दिवस खूप कठीण होता. रक्षाबंधन संपल्यानंतर तुझ्या फोटोसमोर फुले ठेवताना मी स्वतःला शांत ठेवण्याचा प्रयत्न करत होते. पण आई रडत होती. जो धागा आपल्याला जोडतो, तो दिसत नसला तरी मजबूत आणि तुटता न येणारा आहे. आपल्या आठवणींप्रमाणेच तो चिरंतन आहे. मी तुझ्यासोबत घालवलेले क्षण पुन्हा जगत आहे आणि आता मी स्वतः ला तुझ्या इच्छा आणि स्वप्नांचे रक्षण करताना पाहते. जर तू इथे असतास तर सगळे काही वेगळे झाले असते, सगळे चांगले झाले असते.

# गणेशोत्सवात मुंबईत डीजेवर बंदी कायम

■ मुंबई

**लाडक्या** बाप्पाच्या आगमनाची उलटगणती सुरू असताना, मुंबई हायकोर्टाने गणेशोत्सव काळातील डीजे बंदीचा निर्णय यंदाही कायम ठेवला आहे. ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी अनेक वर्षांपासून लागू असलेली डीजे आणि डॉल्बी सिस्टिमवरील बंदी गणेशोत्सवासह सर्व सार्वजनिक मिरवणुका व सणांना लागू राहणार आहे.

मुंबई पोलिसांनी स्पष्ट केले की, गणेशोत्सवात डीजेचा वापर करणाऱ्या गणेश मंडळांवर कडक कारवाई होईल. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. काही मंडळांनी पर्याय म्हणून पारंपरिक ढोल-ताशा पथकं, लाईव्ह बँड आणि कमी आवाजाच्या साऊंड सिस्टीमचा अवलंब सुरू केला आहे.पर्यावरण आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, डीजेचा प्रचंड आवाज मानवी आरोग्यासाठी घातक आहे. त्यामुळे ही बंदी कायम ठेवण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. तरीही, काही ठिकाणी नियमभंगाच्या तक्रारी येत असून, पोलिसांकडून अशा प्रकारांवर कारवाई सुरू आहे.

# आयडीबीआय बँकेच्या खाजगीकरणाविरोधात कर्मचाऱ्यांचा संप

■ मुंबई

**आयडीबीआय** बँकेच्या खाजगीकरणाच्या विरोधात आज बँकेतील अधिकारी व कर्मचारी यांनी एकदिवसीय देशव्यापी संप केला. या संपात वरिष्ठ कार्यपालक वगळता कंत्राटी कर्मचारी, नियमित कर्मचारी आणि अधिकारी सर्वांनी सहभाग घेतला. मुंबईतील बँकेच्या मुख्यालयासमोर निदर्शनेही करण्यात आली.

सध्या आयडीबीआय बँकेच्या खासगीकरणाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. देशातील पहिली सार्वजनिक



क्षेत्रातील बँक म्हणून ओळखली जाणारी आयडीबीआय खाजसगी क्षेत्रात गेल्यास, सामान्य ठेवीदारांचे हित धोक्यात येईल, असे संपकरी कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यांनी सरकारला बँकेचा मालकी हक्क खासगी तसेच विदेशी भांडवलदारांकडे न देण्याचे आवाहन संपकरी कर्मचाऱ्यांनी सरकारला केले.

युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआयचे देवीदास तुळजापूरकर म्हणाले की, आयडीबीआयचे खाजगीकरण हा आंतरराष्ट्रीय वित्तभांडवलाचा भारतीय बँकिंगवर हल्ला आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर इतरही भारतीय बँकांच्या बाबतीत तोच प्रयोग होईल. ज्यामुळे भारतीय बँकिंगचे अस्तित्व आणि सार्वभौमत्व धोक्यात येईल. सरकारने फेरविचार केला नाही तर सर्व संघटनांना सहभागी करून आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

# गिरे तो भी टांग उपर! रोहित पवारांची टीका

■ मुंबई

**निवडणूक** आयोगाने राहुल गांधी यांना नोटीस पाठवणे म्हणजे गिरे तो भी टांग उपर,असा प्रकार आहे, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार यांनी केली.

निवडणूक आयोगाने मतदार यादीतून वगळलेल्या मतदारांची यादी जाहीर न करण्याचे शपथपत्र न्यायालयात सादर केले आहे. असे करून आयोग नेमके काय आणि कोणासाठी लपवू पहात आहे, असा सवालही रोहित पवार यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे केला.

स्वायत्त संस्था असलेल्या निवडणूक आयोगाने कोणाच्या दबावाखाली काम न करता निष्पक्षपणे काम करणे अपेक्षित आहे. राहुल गांधी यांनी आयोगावर पुराव्यानिशी मतचोरीचा आरोप करून जाहीर पंचनामा केला आहे. तरीही आयोग धुतल्या तांदळासारखे स्वच्छ असल्याचा आव आणत आहे. उलट राहुल गांधी यांच्याकडेच शपथपत्र मागत आहे, असे रोहित पवार आपल्या पोस्टमध्ये म्हणाले.

**पाहिजेत**

जमियत अहलेहदीस, साकीनाका, मुंबई या संस्थेचे एम.यु. उर्दू हायस्कुल, अहले हदीस मस्जिद जवळ, खैरानी रोड, साकीनाका, मुंबई-७२ या उर्दू माध्यम १००% अनुदानीत अल्पसंख्यांक दर्जाप्राप्त शाळेत खालील शिक्षण सेवक भरावयाचे आहे. तरी अर्हताप्राप्त उमेदवारांनी मुलाखती करिता बुधवार २०, ऑगस्त २०२५ सकाळी ठीक ११:०० वाजता खाली दिलेल्या ठिकाणी अर्जदाराने मुलाखती करिता येताना अर्ज व मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित रहावे.
**ठिकाणः एम.यु.उर्दू हायस्कुल, अहलेहदीस मस्जिद जवळ, खैरानी रोड, साकीनाका, मुंबई-७२.**

| अ.क्र. | गट | पद संख्या | शैक्षणिक व व्यवसायीक अर्हता | विषय | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १. | ९वी ते १०वी | १ | बी.ए.बी.एड. | मराठी व हिंदी | १८०००/- |
| | | १ | बी.एस्सी.बी.एड. | गणित | १८०००/- |
| १. | ६वी ते ८वी | १ | बी.ए.डि.एड./बी.एड. सीटीईटी/टीईटी | इंग्रजी/मराठी | १६०००/- |
| | | १ | बी.एस्सी. डि.एड./बी.एड. सीटीईटी/टीईटी | गणित/विज्ञान | १६०००/- |
| **एकुण पदे** | | ४ | | | |


सदर नेमणुका मा. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई उत्तर विभाग, चेंबूर, मुंबई-७१. यांच्या मंजुरीच्या अधिन राहतील.
सही/-
**अध्यक्ष/सचिव,**
जमियत अहलेहदीस, साकीनाका, मुंबई.

## राजकारणाच्या बाबतीत मी तटस्थ आहे

अभिनेता जॉन अब्राहम आपल्या चित्रपट 'तेहरान'मुळे सध्या चर्चेत आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून तो आपल्या या चित्रपटाचे प्रमोशन करत आहे. नुकतेच जॉनने आपल्या या चित्रपटाबद्दल आणि भारतीय सेन्सॉरच्या आव्हानांविषयी एका मुलाखतीमध्ये सविस्तर चर्चा केली. जॉनने सांगितले की, तेहरान बनवत असताना त्याला अनेक समस्यांचा सामना करावा लागला. त्याचा हा सिनेमा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होऊ दिला नाही. एक वेळ अशी देखील आली होती की, त्याला वाटत होते की, हा पूर्ण चित्रपट बंद पडेल. परंतु परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीमुळे तेहरानला एक प्लॅटफॉर्म मिळाला, आणि त्याद्वारे तो हा सिनेमा आता प्रेक्षकांसमोर आणत आहे. जॉनने पुढे सांगितले की, खरं सांगायचे तर त्याला नाही वाटत की तेहरान सिनेमागृहांमध्ये दाखवण्याची परवानगी मिळाली असती. तो परराष्ट्र मंत्रालयाचा आभारी आहे. त्यांनी हा सिनेमा पाहिला आणि आम्हाला काही प्रश्न विचारले, ज्यामुळे चित्रपट स्ट्रीमिंगसाठी पास झाला. अर्थात, यातील काही सीन्स आम्ही कापले आहेत. त्याला असे वाटते की, सेन्सॉरशीप गरजेची आहे, परंतु त्याला ज्या पद्धतीने दाखवले जाते, त्यावर प्रश्न निर्माण होतात. कारण सृजनशील अभिव्यक्ती आणि नियम यामध्ये संतुलन असणे आवश्यक आहे. आत्तापर्यंत तर त्यांनी आमच्याशी चांगले वर्तन केले आहे आणि त्याने खूप जबाबदारीने चित्रपटावर काम केले आहे. स्वच्छ शब्दांत सांगायचे तर तो ना डाव्या विचारसरणीचा आहे आणि ना उजव्या विचारसरणीचा. तो राजकारण या विषयात तटस्थ आहे, पण त्याला राजकारण कळते. त्याच्यासाठी ही गोष्ट सर्वात महत्वाची आहे की, तो इमानदारीने काम कसे करेल. त्याला काळजी वाटते जेव्हा उजव्या बाजूचे चित्रपट मोठ्या प्रमाणात प्रेक्षक मिळवतात. त्यावेळी एक निर्माता म्हणून मी स्वतःला प्रश्न विचारतो की, मी कुठल्या रस्त्यावरून चालत आहे? जास्त पैसा कमावण्यासाठी मी व्यावसायिक चित्रपटांच्या रस्त्यावर जाऊ का, की आपल्या विचारांसह प्रामाणिक राहू? मी दुसरा मार्ग निवडला आहे. 'तेहरान' हा सिनेमा देशभक्तीपर चित्रपट नसून, २०१२ मध्ये झालेला दहशतवादी कट , त्यावेळचा भारत या विषयावर आधारित आहे. या ॲक्शन-थ्रिलर चित्रपटाचे दिग्दर्शन अरुण गोपालन यांनी केले असून हा सिनेमा १४ ऑगस्ट रोजी झी ५ वर प्रदर्शित होत आहे.



परीक्षण




**दाक्षिणात्य सिनेमासृष्टीद्वारे प्रत्येक आठवड्याला दाक्षिणात्य सिनेमा अथवा सीरिज प्रदर्शित होत असते आणि ती अनेक भारतीय भाषांमध्ये ओटीटीवर प्रदर्शित केली जाते. याच यादीमध्ये गेल्या आठवड्यात मूळ तेलुगू भाषेमध्ये असलेली सीरीज मायासभा सोनी लिववर प्रदर्शित झाली आहे. ही एक राजकीय थ्रिलर आहे.**

# वास्तविक सत्ता संघर्षावर आधारित रंजक राजकीय नाट्य- मायासभा सीझन १

### मायासभा चे कथानक

या सीरिजचे कथानक ९० च्या दशकातील दक्षिणेतील राजकारणामध्ये उदय झालेल्या दोन नेत्यांची कथा सांगते. अककरला कृष्णमा नायडू आणि एमएस रामी रेड्डी या दोन आदर्शवादी तरुण नेत्यांच्या भोवती गुंफले गेले आहे. या दोन मित्रांचे रस्ते जात, शक्ती, आणि राजकीय महत्वाकांक्षा त्यांच्या मैत्रीआड येतात आणि ते वेगळे होतात. शेतकरी वर्गातील कृष्णमा नायडू प्रगती करून शक्तिशाली बनण्याचे स्वप्न बघत आहे आणि लोकांच्या जीवनातील गंभीर समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत आहे. तर दुसऱ्या बाजूला रामी रेड्डी, ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यामुळे आणि नातेवाईकाने एका खालच्या वर्गातील मुलीशी विवाह केल्यामुळे त्याच्याच रेड्डी जातीद्वारे बहिष्कृत झाला आहे. आपल्या जातीतील सरंजामी प्रवृत्तीपासून दूर राहून डॉक्टर बनायची त्याची इच्छा आहे. परंतु त्याला राजकारणामध्ये ढकलले जाते. कृष्णमा नायडू शिक्षणाला शेतीतून बाहेर पडायचा रस्ता मानतो, तर रामी रेड्डी शेती आणि मजुरीला शिक्षणाचे एक प्राथमिक रूप मानतो. दोघांमधील हा फरक, वैचारिक अंतर हळूहळू लुप्त होते. दोघांची भेट महाविद्यालयामध्ये होते. दोघांमध्ये मैत्री फुलत जाते. दोघे साथीदार बनतात आणि दोघे राजकारणामध्ये प्रगती करण्याची योजना तयार करतात. आणि त्यानंतर प्रेक्षकांना दिसते ते राजकारण आणि त्यातील दोघांमधील द्वंद्व. या सीरिजचे कथानक काल्पनिक आहे असे सांगितले जात असले तरी 'मायासभा' दाक्षिणेतील बलाढ्य राजकीय नेता नारा चंद्रबाबू नायडू आणि वाय. एस. राजशेखर रेड्डी यांच्या जीवनावरून बेतण्यात आली आहे. त्यांच्यात बनलेली मैत्री आणि नंतर बिघडलेले नातेसंबंध हेच या सीरिजचे सार आहे.सोबतच भारताच्या तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची आणीबाणी आणि संजय गांधी यांच्या द्वारे केली जाणारी सामूहिक नसबंदी यांसारख्या सर्व गोष्टी एका मोठ्या कथेत अंतर्भूत केल्या आहेत. सत्ता संघर्ष हा मायासभाचा मुख्य विषय असून अविभाजित आंध्र प्रदेशच्या बदलत्या राजकारणाचा चेहरा दाखवतो.

### कशी आहे सीरिज ?

देव कट्टा आणि किरण जय कुमार यांनी ही सीरिज दिग्दर्शित केली असून राजकीय विषयांसाठी देव कट्टा तेलुगू चित्रपटसृष्टीमध्ये प्रसिद्ध आहेत. सत्ता, विचारधारा आणि ओळख या मुद्द्यांवर त्यांनी अधिक भर दिला आहे. पहिले दोन एपिसोडमध्ये मुख्य व्यक्तिरेखांचे जीवन आणि गतकाळ दाखवण्यात आले असल्याने सीरिजची सुरुवात संथ वाटते. परंतु या व्यक्तिरेखांची ओळख, त्यांचे गत आयुष्य आणि स्वभाववैशिष्ट्ये यावर प्रकाश टाकल्यामुळे कथानक मुख्य व्यक्तिरेखा समजण्यास मदत होते. बहुसंख्य तेलुगू सिनेमामध्ये अनावश्यक ड्रामा दाखवला जातो. या सीरिजमध्ये देखील तो दाखवला असला तरी सहन करता येण्यासारखा आहे. खासकरून रोमँटिक आणि इमोशनल उपकथानकांची लांबी कमी करता आली असती. मात्र पुढील सर्व एपिसोड्सची गती प्रेक्षकांना थांबायला आणि विचार करायला वाव देत नाही. पुढे काय होईल ही उत्सुकता प्रत्येक एपिसोडच्या




शेवटी मनामध्ये निर्माण होते. सीरिज वास्तविक बनवण्याचा प्रयत्न करण्यात आल्यामुळे अन्य सीरिजमध्ये दिसणारा तडक-भडकपणा या सीरिजमध्ये बघायला मिळत नाही. कॉलेजमधील राजकारण, जातीय मुद्दे आणि अंतर्गत मानसिक संघर्षाला अधिक परिपक्व आणि विचारपूर्वक सादर केले आहे. अर्थात, तिखट भाषाप्रयोग, गंभीर-व्यापक राजकीय विषय आणि काही बोल्ड कन्टेन्ट यामुळे ही सीरिज लहान मुलांसमोर न बघितलेली बरी. सीरिजचे दिग्दर्शन गंभीर आणि संतुलित आहे, आणि सीरिजच्या तांत्रिक बाजू उत्तम आहेत. दिग्दर्शक प्रकाश झा यांच्या राजकीय विषयक चित्रपटाचा भाव यामध्ये जाणवतो. सेट, वेशभूषा आणि लोकेशनमुळे कथा वास्तविक बनण्यात महत्त्वपूर्ण मदत झाली आहे. शक्तिकांत कार्तिकचे पार्श्वसंगीत चांगले असून, ते सीन्सना उठाव देणारे आहे. मायासभाचा शेवट एका अशा टप्प्यावर येतो, जिथे ही सीरिज दुसऱ्या सीझनची पार्श्वभूमी तयार करते.

### अभिनय

कृष्णमा नायडूच्या भूमिकेत पिनिसेट्टी यांनी उत्तम अभिनय केला आहे. चैतन्य राव यांचा रामी रेड्डीच्या व्यक्तिरेखेमध्ये प्रेक्षकांना प्रभावित करतो, तर अभिनेत्री दिव्या दत्ताने इरावती बसूच्या भूमिकेत आपली छाप सोडली आहे. दाक्षिणात्य सिनेजगतात या सीरिजद्वारे तिचे पदार्पण झाले आहे. ज्येष्ठ अभिनेता नासर यांची भूमिका लहान असली तरी त्यांनी ती अतिशय प्रभावीपणे साकार केली आहे. साई कुमार यांनी एका आकर्षक, लोकप्रिय अभिनेत्यापासून राजनेता बनलेल्या आरसीआरची भूमिका उत्कृष्ट रितीने पार पाडली आहे. ही व्यक्तिरेखा तुम्हाला दाक्षिणात्य लोकप्रिय अभिनेता-बलवान नेता एनटी रामाराव यांची आठवण करून देईल.

तुम्हाला सत्य घटनांवर आधारित आणि वास्तविक व्यक्तींच्या सीरिज आवडत असतील, राजकीय विषयाचे चाहते असाल तर ही सीरिज तुम्हाला निश्चितच आवडेल.

**वेबसीरिज:** मायासभा
**दिग्दर्शक:** देवा कट्टा, किरण जय कुमार
**पटकथा लेखन:** देवा कट्टा
**कलाकार:** आधी पिनिसेट्टी, चैतन्य राव मदादी, साईकुमार, दिव्या दत्ता
**ओटीटी प्लॅटफॉर्म:** सोनी लिव
**रेटिंग:** ३/ ५

# अबीर गुलाल प्रदर्शित होणार का?



२०१८ मध्ये पाकिस्तानी कलाकार, गायक आणि विनोदी कलाकार यांच्या भारतीय चित्रपटसृष्टीमध्ये काम करण्यावर बंदी घालण्यात आली होती. मात्र, काही काळापूर्वी भारतीय कोर्टाने ही बंदी उठवली. त्यानंतर पाकिस्तानी अभिनेता फवाद खानने पुन्हा एकदा भारतीय चित्रपटामध्ये काम करण्याचा प्रयत्न सुरू केला आणि त्याला यश मिळाले. 'अबीर गुलाल' या भारतीय सिनेमामध्ये त्याला अभिनेत्री वाणी कपूरसोबत काम करण्याची संधी मिळाली. परंतु हा चित्रपट प्रदर्शित होण्याच्या मार्गावर असतानाच काश्मीर येथील पहलगाम येथे काही आतंकवाद्यांनी निष्पाप लोकांची हत्या केली. त्यामुळे ९ मे रोजी प्रदर्शित होणारा अबीर गुलाल भारतामध्ये प्रदर्शित न करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु आता बातमी समोर येत आहे की फवाद खान आणि वाणी कपूरच्या या चित्रपटाला प्रदर्शनाची तारीख मिळाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार 'अबीर गुलाल' या सिनेमाचा वर्ल्ड प्रीमियर येत्या २९ ऑगस्टला होत आहे. परंतु हा सिनेमा फक्त ओव्हरसीजमध्ये (भारताबाहेर )प्रदर्शित केला जाणार असून भारतात दिसणार नाही. हाच फॉर्म्युला पंजाबी गायक दिलजीत दोसांझने सरदारजी ३ साठी वापरला आहे. मोठ्या पडद्यावर 'अबीर गुलाल' प्रदर्शित होणे अत्यंत कठीण आहे.

# दाक्षिणात्य सुपरस्टार बॉलीवूडमध्ये काम करायला घाबरतात कारण...

**दाक्षिणात्य सुपरस्टार ज्युनिअर एनटीआर 'वॉर २' या सिनेमाद्वारे बॉलीवूडमध्ये पदार्पण करत आहे. हा सिनेमा १४ ऑगस्ट रोजी भारतभर प्रदर्शित होत आहे. सिनेमाच्या प्रमोशनासाठी नुकताच एक समारंभ हैदराबाद येथे आयोजित करण्यात आला होता, आणि त्या कार्यक्रमामध्ये ऋतिक रोशन आणि ज्युनिअर एनटीआर दोघेही पहिल्यांदाच एकत्र जनतेसमोर आले. त्यावेळी ज्युनिअर एनटीआरने ऋतिकची भरपूर प्रशंसा केली. त्याने ऋतिकला सांगितले की, ७५ दिवस तुझ्यासह काम करताना मी खूप काही शिकलो. मी पुन्हा तुझ्यासह येण्याची अधिक वाट पाहू शकत नाही. मला आपला भाऊ मानल्याबद्दल धन्यवाद. शूटिंगच्या पहिल्या दिवशी तू मला आपुलकीने मिठी मारत माझे स्वागत केले त्याबद्दल आभार. 'वॉर २' च्या शूटिंग दरम्यान तुझ्यासह घालवलेले क्षण मी कधी विसरू शकणार नाही.' २०२२ मध्ये दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या आरआरआर या चित्रपटाने ज्युनिअर एनटीआरला पॅन इंडिया स्टार बनवले होते. त्या गोष्टीचा उल्लेख करत ज्युनिअर एनटीआरने सांगितले की, 'मी दक्षिणेकडचा**



**आहे. राजामौली सरांचे धन्यवाद की, त्यांनी सर्व सीमा पुसून टाकल्या, ज्या उत्तर आणि दक्षिण चित्रपटांमध्ये आहेत.' तरीही प्रत्येक दाक्षिणात्य सुपरस्टारच्या मनामध्ये एक भीती असते की, हे लोक (बॉलीवूड) आमचा स्वीकार करतील की नाही? त्यावेळी ऋतिक रोशनने सांगितले की, 'आपण भाऊ आहोत, एकाच कुटुंबातील आहोत. तारक (ज्युनिअर एनटीआर) आणि मी सहकलाकार म्हणून काम सुरु केले होते आणि वास्तविक जीवनातील भाऊ असल्याप्रमाणे आम्ही चित्रपट पूर्ण केला.' 'वॉर २' मध्ये बॉबी देओलचा कॅमिओ रोल आहे.**

# ऐश्वर्याच्या तुलनेत घालवलेले पैसे



कावळ्याने हंस बनण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो सुंदर, गोरा दिसू शकत नाही. स्टार अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन आपले सौंदर्य जन्मताच स्वतःसोबत घेऊन आली आहे. तिच्यासारखे बनण्याचा कुणी कितीही प्रयत्न केला तरी कुणाला ऐश्वर्या राय बच्चन बनता येईल का? इन्फ्लुएंसर अपूर्वा मुखिजाने इंडियाज गॉट लेटेंट या वादग्रस्त विनोदी कार्यक्रमामुळे चर्चेत आली आहे. नुकतेच तिने आपला एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करत स्वतःच्या लूक्सविषयी माहिती सांगितली आहे. तिच्यामते, तिने तब्बल तीन लाख रुपये खर्च करून आपला मेकओव्हर केला आहे. स्वतः लाच रोस्ट करत अपूर्वाने या व्हिडिओमध्ये सांगितले आहे की, देवाने मला ॲटिट्यूड तर ऐश्वर्या रायसारखा दिला आहे, पण चेहरा हा दिला नाही. अपूर्वाने आपल्या हेअर ट्रान्सफॉर्मेशनबद्दल सांगितले की, मी सरांना सांगितले होते की, मी केस ब्लीच करू शकत नाही, कारण डोक्यावर चारच केस राहिले आहेत. अपूर्वाने व्हिडिओमध्ये हा देखील खुलासा केला आहे की, माझे दात खरे नसून मी विनियर केले आहे.

# निर्णयाची किंमत मला चुकवावी लागली




सुपरस्टार आमिर खान नेहमीच काहीतरी वेगळे करत असतो. 'सितारे जमीन पर' हा चित्रपट त्याने कुठल्या मोठ्या ओटीटी प्लॅटफॉर्मला न विकता नुकताच यूट्यूबवर प्रदर्शित केला आहे. या प्लॅटफॉर्मवर १०० रुपये भरून कुणीही हा सिनेमा पाहू शकतो. आता आमिरने या सिनेमाच्या बजेट व कमाईवर बोलत अन्य बऱ्याच गोष्टींचा खुलासा केला आहे. एका पॉडकास्टमध्ये आमिर खानने सांगितले की, 'सितारे जमीन पर' चे बजेट सुमारे १२२ कोटी रुपये होते व या सिनेमाने चित्रपटगृहांमध्ये जवळपास २७६ कोटी रुपयांची कमाई केली. हा सिनेमा यूट्यूबवर प्रदर्शित करण्याविषयी आमिरने सांगितले की, यूट्यूबवर हा सिनेमा चांगला चालत आहे. मला जी अपेक्षा होती, त्यापेक्षा चांगला धंदा करत आहे. मला किती कमाई केली याचे अंक सांगण्याची परवानगी नाही. त्यामुळे मी कमाईचे आकडे सांगू शकत नाही. पण मला आशा आहे की, चांगली कमाई होईल. यावेळी मी आणि यूट्यूब, दोघेही वेगवेगळे या सिनेमाचे प्रमोशन करत आहोत.


सिनेमाचे बजेट तयार करतानाच आम्ही त्याचे मार्केटिंग बजेट देखील ठरवले होते. यूट्यूब त्यात आपली ताकद लावत आहे. याचसोबत यूट्यूबने सुध्दा त्यांचे एक मार्केटिंग बजेट ठेवले आहे. आमिरने पुढे सांगितले की, मला माझ्या या निर्णयाची किंमत देखील चुकवावी लागली आहे. कारण सुरुवातीला या सिनेमाचे बजेट ९६ कोटी रुपये (११ मिलियन डॉलर) होते, पण माझ्या भागीदारांना कळलं की, आमिर ओटीटी डील करत नसून त्यामुळे त्यांना मोठा फायदा होणार नाही ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. यूट्यूबवर चित्रपट प्रदर्शित करण्याच्या माझ्या निर्णयाबाबत ते अजिबात खुश नव्हते. त्यांना ही गोष्ट आवडली नाही की, मी पैसे हातचे जाऊ देत आहे. म्हणून त्यांनी मला सांगितले की, मीच हा चित्रपट खरेदी करावा. त्यामुळे सितारे जमीन पर मला १२२ कोटी रुपयांना (१४ मिलियन डॉलर) विकत घ्यावा लागला.

# बागी ४ च्या टीझरला 'ए' सर्टिफिकेट

बागी हा चित्रपट आणि त्याचे आत्तापर्यंत बनलेले भाग यांनी निर्माता साजिद नाडियाडवालाला सर्वाधिक कमाई करून दिली आहे. आता 'बागी' चा चौथा भाग बागी ४ या नावाने लवकरच प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे अभिनेता टायगर श्रॉफ रॉनीच्या भूमिकेत पुनरागमन करत आहे आणि या सिनेमात त्याने आत्तापर्यंत सर्वाधिक ॲक्शन सीन्स केले आहेत. त्यामुळे टायगर आणि बागी सिनेमाचे चाहते बागी ४ चा टीझर बघण्यास उत्सुक होते. मात्र १ मिनिट ५३ सेकंदाचा हा टीझर काल ११ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झाला आहे. टीझर प्रदर्शित होण्याच्या एक दिवस आधी सीबीएफसीने त्याला 'ए' सर्टिफिकेट दिले आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन म्हणजेच सीबीएफसीने बागी ४ च्या टीझरला 'ए' रेटिंग दिले आहे.



## नवाकाळ शब्दकोडे-१३४०



**आडवे शब्द –** ३. बाधा, संसर्ग ६. विपुल, पर्याप्त ८. मुर्गा, कुक्कुट ११. बेपर्वा १२. शेपूची भाजी १४. स्त्रियांचे एक कर्णभूषण १६. चिकूसारखे दिसणारे महाग विदेशी फळ १८. त्रस्त १९. झुंड २१. अनुमान, तर्क २२. चौदा ओळी असलेला काव्यप्रकार २४. बहीण किंवा भाऊ २५. अधीन २६. अंगरखा २७. सतत नकाराचा सूर लावणारा, रड्या २९. सहाय्य ३२. जागरूक ३४. दरवाजा ३५. साडीचा शेव ३६. लग्न न झालेली व्यक्ती ३८. आर्द्र हवामान ३९. बटाटे, रताळी वगैरेचा उपवासाला चालणारा पदार्थ ४०. उत्साह, धडाडी ४३. रक्ताचा रंग ४५. प्रामाणिकपणा ४६. गावातली जुनी व मूळ वस्ती, व्यापारी पेठ ४७. चोखंदळ नजर असलेला ४८. नव्वद अंशांचा कोन ५०. टारगट ५१. दिवस ५२. डाळ तांदळाची पेज ५५. शिंपल्यात राहणारा प्राणी ५६. कागद चिकटवण्याचे एक साधन ५७. अंधारात चमकणारा कीटक ६०. योग्य तसे, यथायोग्य ६३. सावकार ६५. रमलेला ६६. अंदाज ६७अ. पाकातली बंगाली मिठाई ६९. त्रासदायक ७१. आयुर्वेदिक उपचार करणारा ७२. दूध ७३. रायवळ आंब्याचे सारस्वती रायते ७४. देखावा ७५. दरवाजा ७६. जुने फाटके वस्त्र ७८. राजप्रासाद ८०. नाराज ८१. वृक्ष ८२. पोथी, जाड पुस्तक ८३. मोठी तलवार ८६. क्षमा ८७. महाभारतातला जुगार ८८. युद्ध, समर ८९. नियंत्रण ९१. शस्त्राची तीक्ष्णता ९२. चौदा रत्नांपैकी एक, प्राजक्त ९३. खालचे ९५. हरवलेले ९८. दहशत १००. प्रपात १०२. तबल्याच्या जोडीचे वाद्य १०३. शनिवार १०४. सामूहिक आकांत

**उभे शब्द –** १. फजिती २. सगळीकडे ३. लक्षावधी ४. नड असलेला ५. स्तब्ध, नीरव ६. फूल ७. याची खिचडी उपवासाला चालते ८. अडचण ९. जखीण, स्त्री-पिशाच्च ११. पिकदाणी १२. मृतदेह १३. रोमांचित १५. हत्ती १७. अनासक्त, विरक्त २०. नारळ २२. चित्तवेधक, रंजक २३. माधुर्य २४. गृहकलह २५. आतल्या गोटातल्या लोकांनाच ज्ञात असलेली गोष्ट २७. जिनसांची यादी २८. खूप खाल्ल्यावर पोट फुगून आलेली कळ २९. माज ३०. कायम लक्षात राहील असे ३१. दिलेले, स्वाधीन केलेले ३३. निगा न राखलेले कोरडे व राठ केस ३५. ताबडतोब, लगेच ३७. दाल-फ्रायवर वरून दिलेली झणझणीत फोडणी ४१. प्रहार, आर्थिक भुर्दंड ४२. मनुष्य, माणूस ४४. मध्यस्थी व निर्णय देणारी यंत्रणा, आर्बिट्रेटर ४५. व्यवस्थित ४७. एक चतुर्थांश ४९. नाठाळ गुराच्या गळ्यात बांधलेले लाकूड ५१. बत्ती, दीपक ५३. जाड दोर ५४. साठलेले ५६. प्रेमाने कुरवाळणे ५८. माघ शुद्ध पक्षातली एकादशी ५९. नम्र ६१. महती, मोठेपणा ६२. काळजीपूर्वक ६४. ऋषी, तपस्वी ६६. आरंभीचा ६७. आजोबांचे आजोबा ६८. लेखी करारमदार ६९. निःश्वास ७०. पातळ पदार्थ ७१. व्यापारी ७४. द्रौपदीचा भाऊ ७५. लाकडी जिना, मुंबईचे एक उपनगर ७६. किल्ल्यांचा गुच्छ ७७. फुलातील पराग ७९. अस्थी ८२. रामायणातील पहिला भाग ८४. मधाप्रमाणे गोड ८५. कथेकरी, कीर्तनकार ८६. जखमेतून वाहणारे रक्त ९०. मागाहून, नंतर ९३. फौंटन पेनचे टोक ९४. बातमी, वार्ता ९६. हद्दत, इंगित ९७. आवाज, छंद ९९. ताकद, जोर १००. पाठ्यपुस्तकातील गद्य वेचा १०१. व्यवस्थित •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३९चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. वावदूक ५. वैशाखनंदन ९. खारफुटी ११. गोवर्धन १२. मंदिर १४. वात १५. जमदाड १६. खंडन १७. गटार १८. खवा २०. गडू २३. सारी २४. प्रबंध २७. लपेटणे २९. सरबराई ३२. दीडदमडीचा ३५. हल ३७. पहाट ३९. पारखा ४०. मदिरा ४१. बोलवा ४२. खण ४३. बघे ४५. वासव ४७. वश ४९. टच ५१. रदन ५३. खर्च ५४. तारा ५६. कमलाकर ५८. पावन ६०. पाव ६१. शयन ६३. हिमनगजा ६४. परखड ६६. तेगार ६८. संकुचित ७०. आतप ७२. राखरांगोळी ७३. कल्ला ७४. लवण ७५. टवळी ७७. ठीक ७८. पथकर ८०. फज्जा ८१. पालट ८२. बलवान ८४. मुक्त ८५. पोप ८७. वसा ८८. खबरदारी ८९. संजीवनी ९१. प्रहेलिका ९३. कर ९४. मुभा ९५. रममाण ९७. ताजवा १००. कांत १०२. षटक १०३. स्तवन १०५. वाहवणे १०६. पिता १०७. शिरस्त्राण १०८. डबीर १०८. टग्या

**उभे शब्द :** १. जागोजाग २. वार्धक्य ३. वन ४. कमंडलू ५. वैर ६. खवाटा ७. नंतर ८. नजरबंदी ९. खादाड १०. रड १३. दिन १७. गरीब १९. वाटचाल २१. डूल २२. पटल २३. सारथ्य २५. धडपा २६. हमखास २८. पेहराव ३०. रापण ३१. ईहा ३३. दरवान ३४. अमलताश ३६. बोलबाला ३८. टब ४२. खच ४४. घेर ४६. वखवख ४८. शक ४९. टर ५०. अवनत ५२. दर्या ५५. रायते ५७. मख्ख ५८. पाम ५९. नग ६०. पारपटल ६२. नगारा ६३. हितकर ६४. पत ६५. डहाळी ६७. रखवालदार ६८. संगोपन ६९. कुळीथ ७०. आण ७१. पिठीसाखर ७४. लज्जा ७६. वटवट ७९. कलौंजी ८०. फक्त ८२. बरकत ८३. वारी ८४. मुनीम ८५. पोहे ८६. पलिता ८९. संभाषण ९०. वरकड ९१. प्रणव ९२. काजवा ९६. मास्तर ९८. वाहवा ९९. गणेश १००. कांता १०१. चीर १०४. नट



सायन कोळीवाडा येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त तिरंगा यात्रेचे आयोजन, करण्यात आले. त्यावेळी आ. कॅप्टन तमिळ सेल्वन तिरंगा रॅलीत सामील झाले.

## पारनेर दूध संघ निवडणुकीत विखे पाटलांचे पॅनल विजयी

### १५ पैकी १२ जागांवर वर्चस्व

■ अहिल्यानगर

**पारनेर** तालुका सहकारी दूध संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीत भाजपाचे माजी खासदार सुजय विखे-पाटील आणि शिंदे गटाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखालील जनसेवा मंडळाने १५ पैकी १२ जागांवर विजय मिळवत वर्चस्व निर्माण केले. खासदार नीलेश लंके समर्थक सहकार विकास पॅनलला केवळ ३ जागांवर समाधान मानावे लागले.



जनसेवा मंडळाचे दादाभाऊ वारे, किसन गवळी, दत्तात्रय पवार, संदीप ठुबे, कल्याण काळे, सविता औटी, उत्तम भालेकर, निर्मला भालेकर, इतर मागास प्रवर्गातून युवराज पठारे, अनुसूचित जातीमधून भीमराव शिंदे आणि विमुक्त जाती मतदारसंघातून राजेंद्र पचारणे विजयी झाले. तर खासदार लंके समर्थक सहकार विकास मंडळाचे सर्वसाधारण मतदारसंघातून अनिकेत पठारे, संतोष गांगड व महिला मतदार संघातून पूनम मुंगसे असे ३ उमेदवार विजयी झाले. केवळ ८१ मतदार असलेल्या या निवडणुकीत उमेदवारांशिवाय ५१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानानंतर तत्काळ मतमोजणी होऊन निर्णय जाहीर करण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून टी. बी. भोजने आणि सहायक म्हणून अभिजित करपे यांनी काम पाहिले.

## भ्रष्ट मंत्र्यांचा राजीनामा का नाही? उबाठाचे राज्यव्यापी आंदोलन

» पान १ वरून

व प्रसंग चांगलेच वादग्रस्त ठरले आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे राज्याच्या विविध भागात जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक करून नंतर सोडून दिले. मुंबई, ठाणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे, अमरावती, नंदूरबार, कोल्हापूरसह अनेक शहरांमध्ये चौकाचौकात उबाठाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी या आंदोलनात भाग घेतला. मुंबईत शिवाजी पार्क येथे स्व. मिनाताई ठाकरे यांच्या पुतळ्याजवळ हजारोंच्या संख्येने जमलेल्या शिवसैनिकांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. यावेळी मंत्र्यांच्या विरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, भ्रष्टाचाराच्या विरोधात आज संपूर्ण राज्यातील जनता रस्त्यावर उतरली आहे. आपण हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा, शाहू फुले आंबेडकरांचा व संतांचा आहे असे म्हणतो. आता तो भ्रष्टाचाऱ्यांचा झाला आहे. नितीमत्तेमध्ये या सरकारने महाराष्ट्राला अगदी शेवटच्या रांगेत नेऊन बसवले आहे. एकेकाळी मंत्र्यांवर आरोप झाल्यावर त्यांचे राजीनामे घेतले जायचे. आता त्यांना पाठीशी घातले जात आहे. हे सरकार जनताभिमुख आहे की, पैसाभिमुख आहे? फडणवीस यांच्या मंत्र्यांविरोधात अंबादास दानवे व अनिल परब यांनी पुरावे दिले तरीही फडणवीस म्हणतात की, आम्ही त्यांना समज दिली. म्हणजे काय तर पुढच्या वेळेस सावली बार उघडू नका, बॅगा उघड्या टाकू नका, अशी समज दिली असावी. इतके पुरावे देऊनही तुम्ही कारवाई करत नाहीत याचा अर्थ तुमच्यावर कोणाचा दबाव आहे का? उद्या तुमच्यावर जनतेचा दबाव वाढला तर तुम्हाला पळता भुई थोडी होईल. फडणवीसांकडे पाशवी बहुमत आहे. दिल्लीतून सहकार्य आहे. तरीही ते कारवाई करत नसतील तर त्यासाठी जनतेलाच पुढाकार घ्यावा लागेल.

## विरोधक हवेत बाण सोडतात मुख्यमंत्री फडणवीसांचा टोला

» पान १ वरून

विरुद्ध मुंडेंनी अनेक विषय मांडले. अलीकडे लोक हवेत बाण सोडतात. दुसऱ्या दिवशी वेगळेच बोलतात. दाऊदच्या बोलबाल्याच्या काळातही त्यांनी नाव घेऊन सत्ताधाऱ्यांना ठणकावले आणि राज्यात एक वातावरण निर्माण केले.

यावेळी गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, स्वाभिमान कधीही गहाण ठेवायचा नाही, तुकडे स्वीकारायचे नाहीत, असे बाबांनी मला शिकवले. जिवंतपणी त्यांनी मला वारस घोषित केले. आयुष्यात काय करायचे हे त्यांनी शिकवले नाही, पण काय करू नये हे शिकवले. बेरजेचे राजकारण हे त्यांचे वैशिष्ट्य होते आणि तेच मुख्यमंत्री फडणवीस पुढे नेत आहेत.

## कुंडेश्वर येथे भाविकांच्या गाडीचा अपघात! ७ महिलांचा मृत्यू

■ पुणे

**श्रावण** महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील कुंडेश्वर येथे दर्शनासाठी निघालेल्या महिला भाविकांच्या पिकअप गाडीचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत ७ महिलांचा मृत्यू झाला असून, सुमारे ३५ महिला जखमी झाल्या आहेत.

कुंडेश्वर येथे दर्शनाला जात असताना नागमोडी वळणावर घाट चढताना महिला भाविकांची जीप उलटून थेट ३० फूट दरीत कोसळली. दुपारी सव्वाएक वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. घटनास्थळी मृतदेह, चपलांचा खच पडला होता. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव



घेऊन मदतकार्याला सुरुवात केली. जखमी महिलांना खासगी रुग्णालयात व चांडोली येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## एकनाथ शिंदेंकडून ठाण्यात रस्ते पाहणी

■ ठाणे

**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांनी आज ठाण्यात घोडबंदर येथील रस्त्याची पाहणी केली. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरदेसाईही उपस्थित होते. ठाण्यातील वाहतूक कोंडी व रस्त्यांची अवस्था वाईट असल्याने ठाणेकरांनी समाजमाध्यमावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यातही ठाण्याहून बोरिवलीला जोडणाऱ्या घोडबंदर रस्त्याची चाळण झाली आहे. या रस्त्याची आज एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली. ठेकेदार व रस्ते अभियंत्यांना त्यांनी सूचना दिल्या. या रस्त्याची दुरुस्ती आता त्रिस्तरीय पद्धतीने होत आहे. त्यातही शेवटचा थर हा मास्किंगचा टाकण्यात येणार असल्याने हा रस्ता अधिक टणक होईल असेही त्यांनी सांगितले.

## राजे रघुजी भोसलेंची तलवार १८ ऑगस्टला महाराष्ट्रात

» पान १ वरून

सरकारने ही तलवार लिलावातून खरेदी केली होती. आज तिचा ताबा राज्य सरकारकडे आला आहे. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करू ही तलवार १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मुंबई विमानतळावर दाखल होईल. शेलार यांच्या उपस्थितीत बाईक रॅलीद्वारे तिला दादरच्या पु. ल. देशपांडे कला अकादमीमध्ये नेण्यात येईल. त्याच दिवशी गडगर्जना कार्यक्रमही होणार आहे.

**जाहीर सुचना**

या नोटीसद्वारे सर्व संबधितांना सूचना देण्यात येते कि, शिल्पा सहकारी गृह संस्था मर्यादित एच. डी. कोपरकर मार्ग., जयदीप नगर, भांडूप (पुर्व), मुंबई ४०० ०४२ या सोसायटीमधील सदनिका क्रमांक ०३ तळ मजला हि कै. सुरेश महादेव सावंत यांचे नावावर होती. तसेच त्यांचा भाग दाखला अनु. क्रमांक 0१९, (पाच भाग प्रत्येकी रुपये ५०/-चे) एकूण रुपये २५०/- असून वितरीत भाग अनुक्रमे ८६ ते ९० असे आहेत. कै. सुरेश महदेव सावंत यांचा मृत्यु दिनांक ३१.०७.२०२१ रोजी झाला. त्यानंतर नामनिर्देशन अर्जानुसार सदरहू सदनिका आणि भाग दाखला क्रमांक १९, त्यांची पत्नी श्रीमती शोभा सुरेश सावंत यांच्या नावावर दिनांक १०.१२.२०२३ रोजी करण्यात आला. त्यानंतर दिनांक ०३.०३.२०२५ रोजी श्रीमती शोभा सुरेश सावंत यांचे निधन झालेउभयताना मुलबाळ नाही आणि त्यांनी मृत्युपत्र अथवा इच्छापत्र न केल्यामुळे त्यांनी सदरहू सदनिकेसाठी नामनिर्देशन अर्ज संस्थेच्या दप्तरी दाखल केलेला आहे. नामनिर्देशन अर्जावर त्यांनी त्यांचा भाचा श्री राहुल सुरेशचंद्र साटम आधार क्रमांक ९४०० ४९९७ ८५९४यांचा १००% हक्क नोंद असावा असा उल्लेख आहे. त्यामुळे सदरहु सदनिका आणि संबधित भागदाखला नावावर बदली करण्यासाठी वरील मयत व्यक्तींच्या भाच्याने वारस व्यक्तीअसल्यामुळे संस्थेकडे उपविधी प्रमाणे अर्ज केलेला आहे. तरी या व्यतिरिक्त सदरहू खो.क्रं. ०३ शिल्पासहकारी गृह संस्था एच. डी. कोपरकर मार्ग., जयदीप नगर, भांडूप (पुर्व), मुंबई४०० ०४२ च्या बाबतीत कोणाही व्यक्तीचा सदरहु खोलीकिंवा भागावर विक्री,अदलाबदल,गहाण,बक्षीस,विश्वस्त,वार साहक्क,अंत्यदान,कब्जा,भाडेपट्टा,धारणाधिकार, सुविधाधिकार किंवा अन्य कोणत्याही मार्गाने कोणताही हीतसंबंधाचा दावा असेल तर निम्नस्वाक्षीकरांना त्यांच्या ५१२ अे,सी,विंग कैलास एस्प्लनेड, एल.बी.एस.मार्ग, घाटकोपर (प) मुंबई ४०००८६ या कार्यालयात पुष्ठ्यर्थ कागदपत्रांच्या नोटरीकृत प्रतींसह ह्या जाहिरातीच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसात संध्याकाळी ४ ते रात्री ६ या वेळेत लेखी कळवणे गरजेचे आहे. अन्यथा अशा पद्धतीचा दावा किंवा हितसंबंधाच्या संदर्भाशिवाय भाग दाखल हस्तांतरण पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

मुंबई:

दिनांक :१२.८.२०२५

सही/-
श्री चंद्रकांत बबनराव पोफळे
वकील उच्चन्यायालय, मुंबई
शिल्पा सहकारी गृह संस्था मर्यादित., करिता

## ‘आयुष्मान भारत’ योजनेचा लाभ घेण्यासाठी...

**पीएमजेएवाय अर्थात आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना समाजातील असुरक्षित घटकांसाठी आणि ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी वार्षिक ५ लाखांपर्यंतचा मोफत आरोग्य विमा देते. यामध्ये उत्पन्न मर्यादेची कसलीही अट नाहीये. या योजनेत नावनोंदणी कशी केली जाते याविषयी अनेकांना माहिती नसते. त्याविषयी...**

**अर्ज डाउनलोड करा**

ज्येष्ठ नागरिक किंवा त्यांचे कुटुंबीय गुगल प्ले स्टोअरवरुन किंवा अधिकृत वेबसाइटवरून आयुष्मान भारत ॲप डाउनलोड करू शकतात. त्यानंतर पुढे जाण्यासाठी आपल्या सोयीची भाषा निवडावी.

यानंतर लाभार्थी म्हणून लॉगिन करा. या पर्यायावर ‘कॅप्चा’ आणि मोबाइल नंबर टाकून क्लिक करणे आवश्यक आहे. मोबाईल नंबरवर पाठवलेला ओटीपी (वन टाईम पासवर्ड) टाका. लॉग इन केल्यानंतर, ज्येष्ठ नागरिकांच्या नावनोंदणीसाठी होम स्क्रीनच्या तळाशी जा.

तेथे आधार क्रमांक एंटर करा आणि नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर पाठवलेला ओटीपी वापरून त्याचे प्रमाणीकरण करा.





त्यानंतर, निवासस्थान प्रविष्ट करा. ‘कॅप्चा’ प्रविष्ट केल्यानंतर, एक शोध पर्याय सक्रिय केला जातो, ज्यावर क्लिक केल्यानंतर ज्येष्ठ नागरिक योजनेत आपले नाव आधीच नोंदणीकृत आहे की नाही हे तपासले जाते. आपले नाव नसल्यास ज्येष्ठ नागरिकाने नव्याने नावनोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. इथे ओटीपी पडताळणीची आणखी एक फेरी पार पडेल. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांना पडताळणीसाठी त्यांचा लाइव्ह फोटो क्लिक करण्याची सूचना दिसेल.

हा फोटो काढून झाल्यानंतर ओटीपी पडताळणीसाठी मोबाइल नंबर, शहर, राज्य, पत्ता, प्रभाग तपशील, पिन कोड इत्यादी तपशील प्रविष्ट करणे आणि सबमिट करणे आवश्यक आहे.

एकदा सर्व तपशील प्रविष्ट केल्यानंतर, वापरकर्ता मंजुरीसाठी अर्ज सबमिट करू शकतो. एकदा मंजूर झाल्यानंतर, लाभार्थीला आयुष्मान कार्ड जारी केले जाते. हे कार्ड जपून ठेवणे आवश्यक आहे. कारण या कार्डच्या आधारे ज्येष्ठ नागरिक या योजनेचा लाभ घेऊ शकतात.





## माजी उपराष्ट्रपती धनखड आहेत कुठे? संजय राऊतांचे अमित शहांना पत्र

» पान ८ वरून

आपण माहिती दिली नाही तर नाईलाजास्तव आम्हाला न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल करावी लागेल, असे संजय राऊत यांनी पत्रात म्हटले आहे.

आजच्या इंडिया आघाडीच्या निवडणूक आयोगाच्या विरोधातील मोर्चाबद्दल बोलताना राऊत यांनी आयोगावर सडकून टीका केली. निवडणूक आयोग हे दुतोंडी गांडूळ आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पुरावे दाखवून देखील आयोग त्यांच्याकडे पुरावे मागत आहे. महाराष्ट्रात अमोल कीर्तिकर यांची जागा कशी चोरली याचे पुरावे आम्ही आयोगाला दिले आहेत. त्याचे आयोगाने काय केले हे राज्याच्या जनतेने पाहिले आहे, असे राऊत म्हणाले.

## भटके कुत्रे दिल्लीबाहेर घालवा सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

» पान १ वरून

की, हा गंभीर प्रश्न आहे. प्रशासनाने लवकरात लवकर सर्व विभागांमधून कुत्रे पकडण्याची मोहीम तीव्र करावी. त्यांना तयार करण्यात आलेल्या विशेष जागेमध्ये ठेवण्यात यावे. याकामासाठी अतिरिक्त मनुष्यबळाची गरज लागल्यास त्याची पूर्तताही तातडीने करावी. सर्व विभाग कुत्र्यांपासून मुक्त करण्यासाठी ही पहिली व शेवटची मोहीम आहे, असे समजून ती राबवावी. त्यात कोणतीही तडजोड करू नये.

# नवाकाळ

• पुणे | मंगळवार १२ ऑगस्ट, २०२५ • पान -८


## जैन मुनीच्या वक्तव्याशी सहमत नाही! मंगलप्रभात लोढा



**मुंबई -** जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी कबुतरखान्यावरील कारवाईविरोधात उपोषण करण्याची आणि गरज पडल्यास शस्त्र हाती घेण्याचा इशारा दिला आहे. यावर प्रतिक्रिया देताना राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, मी जैन मुनी निलेशचंद्र विजय यांच्या वक्तव्याशी सहमत नाही. मी यासंदर्भात दोनवेळा बोललो आहे. मी माझी भूमिका निभावत आहे. मी आता यावर बोलणार नाही.



महालक्ष्मीचा मोरया (मुंबई)



स्लेटर रोडचा राजा, ग्रँट रोड.

## बाहुबली फेम राणा दग्गुबतीची ईडीच्या कार्यालयात हजेरी

■ हैदराबाद

**ऑनलाईन** बेटिंग ॲप आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणी बाहुबली चित्रपटातील अभिनेता राणा दग्गुबती आज हैदराबादच्या बशीरबाग येथील अंमलबजावणी संचलनालयाच्या (ईडी) कार्यालयात जबाब नोंदवण्यासाठी हजर झाला.

राणा दग्गुबतीला बेटिंग ॲपद्वारे केलेल्या व्यवहारांबद्दल चौकशी करण्यासाठी २३ जुलै रोजी हजर राहण्याचे समन्स बजावण्यात आले होते. मात्र चित्रीकरणात व्यग्र असल्याने तो दिलेल्या तारखेला ईडीच्या कार्यालयात हजर राहिला नव्हता. या प्रकरणात दग्गुबतीसोबत दक्षिणेकडील प्रसिध्द अभिनेता विजय देवरकोंडा याचेही नाव आहे. त्याने ६ ऑगस्ट रोजी ईडीच्या कार्यालयात येऊन आपला जबाब नोंदविला आहे. दग्गुबती, देवरकोंडा आणि प्रकाश राज यांच्यासह अनेक सिने कलावंत ऑनलाईन बेटिंग ॲपचा प्रचार करतात. त्यामुळे लोकांचे आर्थिक नुकसान होते, अशी तक्रार हैदराबादमधील एक व्यापारी फणींद्र शर्मा यांनी मियापूर पोलीस ठाण्यात केली आहे. त्यावरून या अभिनेत्यांची ईडीकडून चौकशी सुरू आहे.

## शुक्रवारपासून पुन्हा पाऊस पंजाबराव डख यांचा अंदाज

■ मुंबई

**गेल्या** काही दिवसांत पावसाचा जोर कमी झाला आहे. सध्या महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत पावसाच्या रिमझिम सरी कोसळत आहेत. मात्र राज्यातील काही भागांत १५ ऑगस्टपासून ते २२ ऑगस्ट दरम्यान मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. पंजाब डख म्हणाले की, १५ ऑगस्टपासून ते २२ ऑगस्ट दरम्यान मुंबई, पुणे, नाशिक, अहिल्यानगर, नंदुरबार, धुळे आणि जळगावमध्ये काही भागांत जोरदार पाऊस कोसळेल. २२ ऑगस्टनंतर काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता आहे. हा पाऊस शेतकऱ्यांसाठी निर्णायक असणार आहे. सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, पुणे येथे पूरस्थिती निर्माण होऊ शकते. नाशिकमध्ये १७ ते २२ ऑगस्ट, तर मराठवाडा आणि पूर्व विदर्भात १४ ते २० ऑगस्टदरम्यान जोरदार पाऊस पडेल.

## माजी उपराष्ट्रपती धनखड आहेत कुठे? संजय राऊतांचे अमित शहांना पत्र

■ मुंबई

**आपल्या** पदाचा तडकाफडकी राजीनामा देणारे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याशी कोणालाही संपर्क साधता येत नसल्याने शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून त्यांचा ठावठिकाणा कुठे आहे, अशी विचारणा केली आहे. शहा यांनी माहिती न दिल्यास न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही राऊत यांनी दिला आहे.



उपराष्ट्रपती हे पद घटनात्मक महत्त्वाचे आहे. अशा पदावरून एखादी व्यक्ती प्रकृतीचे कारण देत तडकाफडकी राजीनामा देते आणि त्यानंतर ती व्यक्ती कुठे आहे, याचा ठावठिकाणा सर्वसामान्यांना लागू नये ही गंभीर बाब आहे. नवीन उपराष्ट्रपती निवडला जात नाही तोवर धनखड यांनी कामकाज पाहायचे आहे. मात्र ते सापडत नाहीत. या देशाचा नागरिक आणि संसद सदस्य या नात्याने माजी उपराष्ट्रपती धनखड कुठे आहेत हे जाणून घेण्याचा मला अधिकार आहे.

आम्ही त्यांच्या घरापर्यंत जाऊन आलो. पण आम्हाला पुढे जाऊ दिले नाही, धनखड यांना त्यांच्या घरात नजरकैदेत ठेवले आहे का, याचे उत्तर मिळाले पाहिजे. » पान ७ वर

## अहमदाबाद विमान अपघातातील मृतांच्या नातेवाईकांची रखडपट्टी

■ अहमदाबाद

**एअर** इंडियाच्या एआय १७१ विमानाला अहमदाबाद येथे झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ६५ परदेशी प्रवाशांच्या नातेवाईकांना अद्याप नुकसानभरपाईची रक्कम मिळालेली नाही.

सरकारी कागदपत्रांची पूर्तता करण्यात या नातेवाईकांची दमछाक होत आहे. यावर बोलताना या ६५ मृतांच्या वतीने कायदेशीर बाजू मांडणारे अमेरिकन ॲटर्नी माईक अँड्र्युज यांनी सरकारी चालढकलीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी त्यांनी टाटा समूहाचे माजी अध्यक्ष दिवंगत रतन टाटा यांची आठवण आवर्जून काढली.

आम्ही अमेरिकन नागरिक असूनही आम्हाला रतन टाटा यांच्या उदार स्वभावाबद्दल थोडीफार माहिती आहे. आपल्या कामगारांप्रती त्यांना असलेली सहानुभुतीची भावना सर्वज्ञात आहे. रतन टाटा जर हयात असते, तर नुकसानभरपाई देण्यात एवढा विलंब नक्कीच झाला नसता, असे आम्हाला वाटते, असे अँड्र्युज म्हणाले.

## बीडीडी चाळींचे भाडे दरमहा ३० हजार करण्याची मागणी



■ मुंबई

**राज्य** शासनाच्या महत्त्वाकांक्षी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील रहिवाशांना सध्या मिळणारे दरमहा २५ हजार रुपयांचे भाडे महागाई व परिसरातील वाढत्या घरभाड्यांच्या पार्श्वभूमीवर अपुरे ठरत असल्याने ते किमान ३० हजार रुपये करण्याची मागणी अखिल बीडीडी चाळ भाडेकरू हक्क संरक्षण समितीचे सरचिटणीस किरण माने यांनी केली आहे.

नायगाव ना. म. जोशी मार्ग आणि वरळी येथील चाळींच्या पुनर्बांधणीला अनुक्रमे २०१७ व २०१९ मध्ये मंजुरी मिळाली. मात्र, प्रत्यक्ष बांधकामाला २०२१ मध्ये सुरुवात झाली.

म्हाडाकडील संक्रमण शिबिरे अपुरी असल्याने पात्र भाडेकरूंना २५ हजार रुपये दरमहा भाडे दिले जात आहे. परंतु, गेल्या दोन वर्षांत घरभाड्यांत झालेल्या मोठ्या वाढीमुळे योग्य घर मिळवणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वरळीतील ५५६ रहिवाश्यांना चाव्या वाटप होणार असून, त्यानंतर काही संक्रमण शिबिरे रिकामी होऊन प्रकल्पास गती मिळण्याची शक्यता आहे. रहिवाशांच्या गरजा लक्षात घेऊन भाडेवाढीचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी मागणी किरण माने यांनी केली आहे.

## एअर इंडियाच्या विमानाचे चेन्नईमध्ये इमर्जन्सी लँडिंग

■ तिरुअनंतपूरम

**रविवारी** रात्री तिरुअनंतपुरमहून दिल्लीसाठी निघालेल्या एअर इंडियाच्या विमानात तांत्रिक दोष आढळून आल्याने आणीबाणीत विमान चेन्नई विमानतळावर उतरवावे लागले. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली. काँग्रेसचे नेते खासदार के. सी. वेणुगोपाल यांच्यासह शंभरहून अधिक प्रवासी या विमानात होते. सुदैवाने आम्ही थोडक्यात बचावलो. विमानात तांत्रिक दोष आढळून आल्यानंतर वैमानिकाने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करण्याचा निर्णय घेतला. मात्र पहिल्यांदा लँडिंगचा प्रयत्न केला असता त्याच धावपट्टीवर दुसरे विमान लँडिंग करत असल्याचे दिसून आल्याने वैमानिकाने प्रसंगावधान दाखवत विमान पुन्हा वर नेले आणि दुसऱ्या धावपट्टीवर सुखरुप लँडिंग केले, असे वेणुगोपाल यांनी सांगितले.

## दिल्लीत खासदारांच्या घरांचे मोदींच्या हस्ते उद्‌घाटन

■ नवी दिल्ली

**राजधानी** दिल्लीतील बाबा खरकसिंग मार्गावर खासदारांसाठी बांधण्यात आलेल्या १८४ सदनिकांचे उद्‌घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घरांसमोर सिंदूरचे रोपटे लावून केले.

खासदारांसाठीच्या या सदनिका बहुमजली आणि ५ हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या आहेत. खासदारांना निवास आणि कार्यालयीन कामे सुलभतेने करता यावीत यासाठी या प्रशस्त सदनिका बांधण्यात आल्या आहेत.

## आमदार संजय गायकवाड नाराज? बॅनरवरून एकनाथ शिंदेंचा फोटो गायब




■ बुलडाणा

**वादग्रस्त** वक्तव्यांमुळे नेहमी चर्चेत राहणारे बुलडाण्याचे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांची नुकतीच पक्षाच्या जिल्हा संघटकपदी नियुक्ती केली आहे. त्यानंतर चिखली शहरात त्यांनी शिंदे गटाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची पहिली संवाद बैठक घेतली. मात्र या बैठकीत लावलेल्या स्टेजवरील बॅनरवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे छायाचित्र नसल्याने राजकीय वर्तुळात त्यांच्या नाराजीच्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

या बॅनरवर फक्त आमदार संजय गायकवाड आणि त्यांचा मुलगा मृत्युंजय गायकवाड यांचीच छायाचित्रे होती. विशेष म्हणजे, बॅनरवर पक्षाचे नाव, पक्षाचे चिन्ह किंवा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेही छायाचित्र नव्हते. शिवसेनेत वरिष्ठ नेत्यांचे फोटो, पक्षाचे नाव व चिन्ह बॅनरवर असणे हा अलिखित नियम मानला जातो. मात्र, याकडे दुर्लक्ष केल्यामुळे गायकवाड यांच्या नाराजीच्या चर्चांना खतपाणी मिळाले आहे. त्यांना याबाबत विचारले असता, त्यांनी थेट उत्तर देण्याचे टाळले. यामुळे ते नाराज असलेल्या चर्चेला आणखी बळ मिळाले.

## मतदारयादी घोळ वक्तव्य काँग्रेस मंत्र्याचा राजीनामा

■ बंगळुरू

**काँग्रेसच्या** काळातही मतदार याद्यांमध्ये घोळ घातला गेला होता, असे विधान केल्याबद्दल कर्नाटकातील मंत्री के. एन. राजण्णा यांना राजीनामा द्यावा लागला आहे.

एकीकडे काँग्रेसचे खासदार व नेते राहुल गांधी व अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे निवडणूक आयोगाच्या विरोधात लढत असताना त्यांनी केलेल्या विधानामुळे त्यांच्यावर राजीनामा देण्याची वेळ आली. त्यांनी म्हटले होते की, मतदार याद्यांमधील घोळ काँग्रेसच्या काळातही झाले होते. मात्र त्यांनी त्याकडे गंभीरपणे पाहिले नाही. तेव्हाही एका व्यक्तीचे नाव तीन वेगवेगळ्या ठिकाणी आले होते. आम्ही त्यावर तोडगा काढला नाही, हे आमच्यासाठी लज्जास्पद होते.






## मतचोरी केली! मोदी सरकार घाबरट? विरोधक आक्रमक ३०० खासदारांचे रस्त्यावर एकत्र आंदोलन! शक्तिप्रदर्शन

» पान १ वरून

अनेक खासदारांना ताब्यात घेत संसद मार्ग पोलीस ठाण्यात नेले. दोन तासांनंतर सर्वांना सोडण्यात आले. दरम्यान विरोधकांच्या गोंधळामुळे लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सकाळीच २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले होते. त्यामुळे कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर आम्हाला सोडण्यात आले, असा आरोप खासदारांनी केला.

नवी दिल्लीचे पोलीस उपायुक्त देवेश कुमार महाला म्हणाले की, ३० खासदारांना निवडणूक आयोगाची परवानगी होती. परंतु विरोधी पक्ष खासदारांची संख्या खूप जास्त होती. त्यामुळे त्यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी ताब्यात घेतल्यावर प्रियंका गांधी म्हणाल्या की, सरकार घाबरलेले आहे, डरपोक आहे. आमची एकजूट पाहून सरकारला घाम फुटला आहे. राहुल गांधी म्हणाले की, सत्य देशासमोर आले आहे. ही संविधानाची लढाई आहे. 'एक व्यक्ती, एक मत' ही आमची भूमिका आहे. आम्हाला फक्त खरी मतदारयादी हवी आहे. ३०० खासदारांना निवडणूक आयोगाला भेटायचे होते, पण आयोगाने सांगितले की, एवढे खासदार येऊ शकत नाहीत. हे लोक घाबरतात. ही लढाई आता राजकारणापलीकडे गेली आहे. मल्लिकार्जुन खरगे यांनी प्रतिक्रिया दिली की, निवडणूक आयोगाने केवळ ३० सदस्यीय शिष्टमंडळाला बोलावले होते. पण ही आघाडी आहे, फक्त ३० सदस्य कसे पाठवणार? आयोगाने एका मोठ्या हॉलमध्ये बैठक घ्यायला हवी होती.









भाजपाकडे कल असल्याचा आरोप असलेले काँग्रेसचे शशी थरूर हेही आंदोलनात होते. ते म्हणाले की, आपल्या निवडणुकांच्या विश्वासार्हतेबाबत जनतेच्या मनात कोणतीही शंका राहू नये. निवडणूक आयोगाची केवळ देशाच्या बाबतीत नाही, तर स्वतःच्या बाबतीतही जबाबदारी आहे. जयराम रमेश म्हणाले की, आम्हाला पुढे जाऊ देत नाही, मध्येच थांबवले आहे. ही संविधानाची हत्या आहे. के. सी. वेणुगोपाल यांनीही सरकारवर निशाणा साधत म्हटले की, पोलीस आणि सरकार आम्हाला ३० सेकंदही मार्च करू देत नाहीत. ते आम्हाला इथे थांबवू इच्छितात. देशात कसली लोकशाही आहे? खासदारांना निवडणूक आयोगात जाण्याचे स्वातंत्र्य नाही का?

राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज झा हे पोलिसांनी अटक केल्यावर म्हणाले, आम्हाला कोणत्या गुहेत घेऊन जात आहेत माहीत नाही. यांच्या हृदयात जागा नाही, मनात घाण आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, आम्ही शांततेत आंदोलन करत आहोत. महात्मा गांधींना आम्ही आपला आदर्श मानतो. संजय राऊत हे सरकारचे षड्यंत्र असल्याचे सांगत म्हणाले की, आम्ही आयोगाची वेळ मागितली होती, पण आम्हाला आयोगाला भेटू दिले नाही.